सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, ४ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# महिला सक्षमीकरणामुळेच देश महासत्ता होईल- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## सिल्लोड येथे 'मुख्यमंत्री:माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ

सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर, दि.२(जिमाका) - महिलांच्या सक्षमीकरणामुळेच देश महासत्ता होईल. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', ही महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणारी कायमस्वरुपी योजना असून सरकारकडून बहिणींना माहेरचा आहेर आहे. राज्यातील महिलांना आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनविणे हे सरकारचे ध्येय्य आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज महिला सशक्तीकरण मेळाव्यात उपस्थित बहिणींना आश्वस्त केले.





सिल्लोड येथे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाचे आज आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला सशक्तीकरणाच्या विविध योजनांचे लाभ आज महिलांना प्रदान करण्यात आले. मुख्यमंत्रीः माझी लाडकी बहिण योजनेचा शुभारंभही यावेळी करण्यात आला. दोन लाख महिलांना लाभ मंजूर झाल्याची घोषणाही करण्यात आली.

या भव्य सोहळ्यास विधानपरिषदेच्या उपसभापती निलमताई गोऱ्हे, पणन व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार, आ. प्रदीप जयस्वाल, आ. रमेश बोरनारे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, महानगर पालिका आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया तसेच तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषणाच्या सुरुवातीला ऑलम्पिकमध्ये ब्रॉन्झ मेडलवर नाव कोरणाऱ्या स्वप्नील कुसाळे या महाराष्ट्राच्या सुपुत्राचं अभिनंदन केलं. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा प्रशासनाचे आणि जिल्ह्याचे नवीन पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचंही अभिनंदन केलं.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तसेच जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या महिलांच्या सक्षमीकरणाच्या विविध योजनांच्या माहिती पुस्तिकेचे विमोचन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

*योजनेचे देशपातळीवर कौतुक*

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मी इतके दिवस म्हणायचो की मला एक बहीण आहे; पण मुख्यमंत्री झाल्यापासून तुमच्या रूपाने राज्यातल्या लाखो बहिणी मला मिळाल्या, हे माझं भाग्य आहे. मी जिथे जातोय तिथे बहिणी राखी बांधायला येतात. इतकं नशीबवान भाऊपण मिळायला भाग्य लागतं. तुमच्या या भावाची जबाबदारीपण आता वाढली आहे. या योजनेमुळे देशपातळीवरही राज्याचे कौतुक झाले आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महिलांच्या सक्षमीकरणाशिवाय हा देश महासत्तेकडे जाऊ शकत नाही. आपण महिलांना दुर्गा म्हणतो, लक्ष्मी म्हणतो, सरस्वती म्हणतो पण फक्त फोटोत पूजा करून भागणार नाही.प्रत्यक्षात महिलांचे हात बळकट करणं महत्वाचं आहे. त्यांना त्यांच्या पायावर उभे केले पाहिजे म्हणून शासनाने या योजना सुरू केल्या आहेत.

*प्रत्येक कुटुंब सुखी करणे हे ध्येय्य*

मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, एक स्त्री म्हणजे एक आख्खं कुटुंब.राज्यातीलं प्रत्येक कुटुंब सुखी - समाधानी करणं हे सरकारचं पहिलं आणि अंतिम ध्येय आहे. महिला सक्षमीकरण हे सरकारच्या प्रत्येक निर्णयात ते दिसलं पाहिजे.शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक अशा सर्व क्षेत्रात महिलांना सक्षम करायचं आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तून महिन्याला दीड हजार म्हणजे वर्षाला १८हजार रुपये एका बहिणीला मिळतील. बहिणींना आता फक्त रक्षाबंधन किंवा भाऊबिजेलाच ओवाळणी मिळणार नाही तर दर महिन्याला दीड हजार रुपयांचा माहेरचा आहेर देणारी ही योजना कायमस्वरूपी आहे,अशा शब्दात त्यांनी उपस्थित महिलांना आश्वस्त केले.

वर्षभरात दोन कोटींहून अधिक भगिनींना लाभ

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, ,लाडकी लेक योजन, मुलींचे उच्च शिक्षणही मोफत करणे, एस.टी. प्रवासात ५० टक्के सवलत, महिला सशक्तीकरण अभियन अशा विविध योजनांमधून एका वर्षांत दोन कोटींपेक्षा जास्त माता भगिनींना याचा लाभ झाला असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, फक्त बहिणींसाठी नव्हे तर लाडक्या भावांसाठीसुध्दा मुख्यमंत्री युवा अप्रेंटिसशीप योजना आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला प्रत्येक गावातून, प्रत्येक शहरातून प्रचंड प्रतिसाद मिळतोय. लाडक्या बहिणींसाठी अर्थसंकल्पात ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अन्य कल्याणकारी योजनांसाठी जवळपास एक लाख कोटी रुपयांची तजवीज केली आहे. जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळावा यासाठी अटी कमी केल्यात. राज्यातील महिलांच्या चेहऱ्यावर या योजनेमुळे आनंद निर्माण झालाय हे सत्य आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी दोन लाख अर्ज मंजूर झाले आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी बहिणींचे अभिनंदनही केले.

*मराठवाडा वॉटरग्रीडची अंमलबजावणी होणार*

मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, मराठवाडा वॉटर ग्रीडची आजवर फक्त चर्चाच व्हायची. पण या योजनेची अंमलबजावणी आता सुरू होणार आहे. जिल्ह्यात उद्योगासाठी गुंतवणुक होत असून रोजगारनिर्मिती होणार आहे. हिरकणी कक्ष बांधण्यासाठी ७५ लाख रूपये देण्याची घोषणाही मुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

*लाभाचे प्रातिनिधीक वितरण*

या सोहळ्यात विविध योजनांच्या लाभार्थी महिलांना प्रमाणपत्राचे व लाभाचे प्रातिनिधीक स्वरुपात वितरण मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये गिताबाई जंजाळ, वर्षा बाळू पांडव, लक्ष्मीबाई पंडित, करुणा बारवाल ,संगीता अंभोरे ,मीराबाई सपकाळ, दिव्या सपकाळ, मनीषा अहिरे ,अखिला याकुब शेख ,शोभा दांडगे , मोनिका शिरसाठ, वत्सला जाधव ,वंदना काकडे, अलकाबाई पगारे, रुकसाना दिलावर तडवी, कविता अहिरे, कल्पना चव्हाण, नंदा पालोदकर इ. महिला लाभार्थ्यांचा समावेश होता.

*स्वतः मुख्यमंत्र्यांनी भरला दिव्याचा फॉर्म*

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभा साठी दिव्या रामदास सपकाळ या बहिणीचा फॉर्म स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भरला आणि त्यावर तिची सही घेऊन तो फॉर्म जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे मंजूरी प्रक्रियेसाठी सुपूर्द केला.

*पारंपारिक वेशभुषेतील बहिणी आणि रक्षाबंधनही*

या सोहळ्यास महिला पारंपारिक वेशभुषेत पेहराव करुन सहभागी झाल्या होत्या. अनेक महिलांनी व्यासपीठावर जाऊन मुख्यमंत्र्यांना राखी बांधली व त्यांच्याशी संवाद साधला. मुख्यमंत्र्यांनी सर्व महिलांना मोबाईल टॉर्च सुरु करण्याचे आवाहन केले त्यास उपस्थित महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

*सिल्लोड मध्ये रोड शो*

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विमानतळापासून सिल्लोड येथे येईपर्यंत रस्त्यात लागणाऱ्या प्रत्येक गावात स्वागत करण्यात आले. तेथेही महिलांनी त्यांना ओवाळले व राखी बांधली. सिल्लोड शहरात तर मुख्यमंत्र्यांचा रोड शो झाला. रोड शोद्वारे सिल्लोडवासियांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी केले तर जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीची माहिती जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सादर केली. सुत्रसंचालन गीता पानसरे यांनी तर आभार विकास मीना यांनी मानले.

# रस्ते अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्र सरकारने सुरु केले 'पायलट प्रोजेक्ट'!

## नितीन गडकरींनी केली मोठी घोषणा

मुंबई : देशभरात सातत्याने छोटे मोठे अपघात घडत असतात. त्यातच सध्या पावसाळ्यात रस्ते अपघात होण्याची शक्यता जास्त असते. मात्र अनेकदा अपघातामध्ये वेळीच उपचार व मदत न मिळाल्याने मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढत जाते. हे प्रकरण लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाने याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकार अपघातग्रस्त पीडितांच्या मदतीसाठी सज्ज झाले असून एक योजना सुरु केली आहे. त्या योजनेदरम्यान पीडितांना उपचारादरम्यान कॅशलेस ट्रीटमेंट देण्यात येणार आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, परिवहन आणि राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना याबद्दल माहिती दिली. केंद्र सरकारने रस्ते अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी पॉलिसी तयार केली आहे. 'पायलट प्रोजेक्ट' असे या पॉलिसीचे नाव असून याद्वारे अपघातग्रस्तांना, जखमी झालेल्या प्रवाशांना कॅशलेस ट्रीटमेंट देण्याचा प्लान तयार करण्यात आला आहे. तसेच सर्वप्रथम या पायलट प्रोजेक्टचं चंदीगढ आणि आसाममध्ये ट्रायल सुरु करण्यात येणार आहे, असेही नितीन गडकरी यांनी म्हटले.

काय आहे योजनेचा फायदा?

या योजनेअंतर्गत अपघातग्रस्तांवर भारत पंतप्रधान जन आरोग्य अंतर्गत लिस्टेड रुग्णालयात उपचार करण्यात येणार आहे. तसेच अपघात झाल्याच्या तारखेपासून पुढे सात दिवसांसाठी दीड लाख रुपयांपर्यंत ट्रॉमा आणि पॉलीट्रॉमा केयरसंबंधी आरोग्य लाभाचे पॅकेज दिले जाणार आहेत.

यांच्या समन्वयाने पार पडणार योजना

ही योजना आरोग्य आणि परिवार कल्याण मंत्रालयअंतर्गत एनएचए, स्थानिक पोलीस, लिस्टेड रुग्णालय, राज्य आरोग्य एजन्सी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र आणि सामान्य विमा परिषदेच्या समन्वयाने पार पडणार आहे. तसेच याबाबत उत्पन्नाचे मार्ग आणि त्यावरील उपाय हे केंद्रीय मोटर वाहन नियम २०२२ अंतर्गत देण्यात आले आहेत.

# गणेश मंडळांसाठी आनंदवार्ता!

## एकाचवेळी मिळणार पुढील ५ वर्षांसाठी मंडप उभारण्याची परवानगी

### प्रशासनाने सुरु केली नवी योजना

मुंबई : येत्या ७ सप्टेंबर रोजी सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन होणार आहे. यासाठी एक दोन महिन्यांपूर्वीच सर्व गणेशभक्त गणरायाच्या स्वागतासाठी सज्ज होतात. तसेच ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून मुंबईतील गणेशोत्सव मंडळांच्या गणेशमूर्तींचे आगमन होण्यास सुरुवात होते. परंतु त्याआधी मंडळांना महापालिकेकडून मंडप बांधण्याची परवानगी घ्यावी लागते. काही दिवसांपूर्वीच महापालिकेने गणेश मंडळाना मंडप उभारणीच्या परवानगीसाठी 'एक ऑनलाइन खिडकी योजना' राबवून देण्याची घोषणा केली होती. परंतु ही योजना सुरु करण्यासाठी यंदा विलंब झाल्यामुळे गणेश मंडळांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेने गणेश मंडळांसाठी आनंदाची घोषणा केली आहे. त्यानुसार मंडळांना आता एकाच वेळी पुढील पाच वर्षांसाठी मंडप उभारण्याची परवानगी मिळणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेशोत्सव मंडळांना मंडप उभारणीसाठी लागणाऱ्या परवानगीसाठी 'एक ऑनलाइन खिडकी योजना' ६ ऑगस्टपासून सुरू केली जाणार आहे. त्याबाबत राज्य सरकारच्या निर्णयानुसार गेली दहा वर्ष नियमांचे आणि कायद्याचे पालन करणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना यंदाच्या गणेशोत्सवापासून सलग पाच वर्षांसाठी विभाग कार्यालयामार्फत एकदाच परवानगी देण्यात येणार आहे. यासाठी सार्वजनिक अथवा खासगी जागेवर गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांनी गेल्या दहा वर्षांत सर्व नियम कायदे याचे पालन केले आहे आणि त्यांच्याविरुद्ध कोणतीही तक्रार नाही, असे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागणार आहे.

# नाशिकमध्ये दिवसाढवळ्या हत्याकांड

नाशिक : पुण्याप्रमाणेच आता नाशिकमध्येही गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. नाशिकमध्ये भरदिवसा दुचाकीवरुन जाणाऱ्या एका इसमाची तीन ते चार अज्ञात लोकांनी हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या हत्येचे कारणही अद्याप समजू शकलेले नाही. प्रमोद वाघ असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून एकूण तिघांनी त्याच्यावर हल्ला केला होता. काल संध्याकाळच्या सुमारास झालेल्या या घटनेने नाशिक परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकरोड सिन्नर फाटा परिसरातील यश टायर्स या दुकानासमोर ही घटना घडली. ३८ वर्षीय प्रमोद रामदास वाघ हे सायंकाळी सहाच्या सुमारास सर्व्हिस रोडने दुचाकीने जात होते. यावेळी संशयित योगेश पगारे आणि त्याच्या साथीदारांनी प्रमोद यांना अडवलं. त्याने जुन्या भांडणाची कुरापत काढून वाद घालण्यास सुरुवात केली. त्यावेळी एकाने प्रमोद याच्यावर रॉडने हल्ला केला.






# केडगाव औद्योगिक वसाहत ते लिंक रोड पर्यंत रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ...

## शहरातील १५० कोटी मधील पहिल्या रस्त्याच्या कामाला सुरुवात - आ. संग्राम जगताप

नगर - शहर हे विकास कामातून बदलत असून हे आता नगरकर बोलू लागले आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून १५० कोटी रुपये मंजूर करून आणले असून त्यातील केडगाव औद्योगिक वसाहत ते लिंक रोड या पहिल्या काँक्रिटीकरण रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. भविष्यकाळात सर्वांगीण विकास कामातून नगर शहर समस्या मुक्त होणार असून रिझल्ट देण्याचे काम सुरू आहे आतापर्यंत कोणाच्या काळात जास्त कामे झाले आहेत याची माहिती जर कोणाला मागायची असेल तर त्यांनी मागावी त्यामध्ये आमदार संग्राम जगताप हेचं नाव घेतले जाईल सर्वांना बरोबर घेऊन पक्ष विरहित विकास कामे सुरू आहेत असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.



केडगाव औद्योगिक वसाहत ते लिंक रोड पर्यंत रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ, आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, आयुक्त यशवंत डांगे, माजी नगरसेवक संजय चोपडा, संतोष बोरा, संतोष बोथरा, नेहूल भंडारी, रमेश गुंदेचा, अमोल मुथीयान, जनक अहुजा, अनिश अहुजा, शहर अभियंता मनोज पारखे, इंजि श्रीकांत निंबाळकर, शशिकांत नजन, आदि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप पुढे म्हणाले की केडगाव औद्योगिक वसाहतीतील उद्योजक राज्य सरकारचा जीएसटी आणि महापालिकेचा कर रुपी टॅक्स भरत असतानाही या परिसरात विकास कामे झाली नाही मात्र गेल्या दोन वर्षांपूर्वीच ही विकास कामे मंजूर झाली होती काही लोकांनी या कामांमध्ये खोडा घातल्यामुळे ती होऊ शकली नाही आता या परिसरातील बहुतांश रस्त्याची कामे मार्गी लागणार आहे भौगोलिक दृष्ट्या शहराच्या विकासाचे नियोजन यापूर्वी झाले नव्हते काही लोक निवडणूक आली की एकत्र येत असतात आणि सांगतात की शहर मागे राहिले, भकास झाले या माध्यमातून आपल्या शहराला नाव ठेवण्याचे काम करतात आणि निवडणुका झाले की ते लोकही सापडत नाही त्यांचा फक्त छुपा अजंठा निवडणुकी पुरताच असतो पहिल्या टप्प्यातील सिना नदीच्या सुशोभीकरणाचे काम सुरू होणार आहे आपल्या सर्वांना पर्यावरणावर काम करावे लागणार आहे प्रदूषण ही मोठी समस्या आपल्यासमोर उभी राहणार असून मेट्रो सिटी मध्ये याची झळ पोचली आहे या दृष्टीने वृक्षारोपण व संवर्धनाची लोक चळवळ उभी करावी लागणार आहे असे ते म्हणाले

उद्योजक संतोष बोथरा म्हणाले की आपल्या शहराला नागरिकांचे व शहराचे प्रश्न माहित असणारे लोकप्रतिनिधी लाभले आहेत ते नियोजनबद्ध व दर्जेदार विकासाची कामे मार्गी लावत आहे औद्योगिक वसाहतीवर शहराची प्रगती अवलंबून असते यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी केडगांव औद्योगिक वसाहतीतील प्रलंबित विकासाची कामे मार्गी लावली आहे असे ते म्हणाले

संतोष बोरा म्हणाले की खड्ड्यांची समस्या फार वर्षापासून आपल्या भारतात आहे मात्र आपल्या शहरातील प्रलंबित प्रश्न आमदार संग्राम जगताप यांनी हाती घेऊन टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्याचे काम सुरू केले आहे नियोजनबद्ध विकास कामे केली असल्यामुळेच ते आता दिसू लागले असे ते म्हणाले

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२३/मशाका/जमाबंदी- १/अन्म-मृत्यु नीद /गिश्रार-८९ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १३/१२/२०२३

१. अर्जदार ०:- अतिक खॉ रशिद खॉ पठाण रा. सावरगांव ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विरुध्द

२. गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय मावरगांव ता. कन्नड जि. द. गंभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार नामे अतिक खां रशिद खॉ पठाण याची जन्म दिनांक ११/०६/१९९८ रोजीची नींद ग्रामपंचायत सावरगांव कार्यालयाच्या अभिलेखान होणे वावत.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड टि.डी. शिंदे यांचे मार्फत अर्जदार यांनी त्याचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यामाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः हाचे जन्म दिनांक ११/०६/१९९८ गंजी मावरगांव ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ११/०६/१९९४ रोजी मावरगांव ना कन्नड येथे आलेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामामाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेम मुचीत करण्यात येते की, अर्जदार यांना त्यांचे जन्म दिनांक ११/०६/१९९४ रोजीचे जन्म आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्याम कोणाम काही उजर/आक्षेप अमल्याम त्यांनी है जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २७/१२/२०२३ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्याम अर्जदाराम दिनांक १ १/०६/१९९४ रोजीचे जन्म आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीननंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १३./१२/२०२३ गेजी मदर जाहिर प्रगटन माझ्या गहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

## जाहिर प्रगटन

**मा. ए. बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क.स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात**

एम.ए.क.२२१/२०२४

CNR-MHAU080039302024

अर्जदार : १.गयाबाई प्रभत मोरे वय ७५ वर्षे, व्यवसाय निरंक रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २. माधवराव प्रभत मोरे वय ५१ वर्षे, व्यवसाय शेती रा. वरील प्रमाणे ३. कुशीवर्ता काशिनाथ मुळे वय ५९ वर्षे, व्यवसाय शेती रा. केळगाव ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे प्रभत सांडू मोरे हे मौजे घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होते. त्यांचा दि.०२.०३.२०२४ रोजी मौजे घाटनांद्रा ता. सिल्लोड येथे मृत्यू झाला आहे. मयताचे अर्जदार क.१ ही पत्नी असून अर्जदार क. २ हा मुलगा असून अर्जदार क. ३ ही मुलगी आहे. अर्जदार व्यतिरिक्त मयत प्रभत सांडू मोरे यांना इतर कुणीही कायदेशीर वारस नाही. मयत नामे प्रभत सांडू मोरे यांच्या वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार क.१ व ३ हेच त्यांचे एकमेव वारसदार आहे. त्यामुळे मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण घडले आहे.

ज्याअर्थी अर्जदार है मयत नामे प्रभत सांडू मोरे यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०१/८/२०२४ रोजी माझ्या सद्दी शिक्यानिशी दिले. पुढील तारीख १९/०८/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय सिल्लोड

जा.क्र. २०२४/मशाका-२/जमीन-२/गायरान (आदि.)/प्र.क्र.-०१

दिनांकः १२.३.२४

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार रुखसानबी जालेखा तडवी, रा. निंबायती, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे जरंडी, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रमांक ३११ मधील क्षेत्र ०० हेक्टर ४० आर जमीन आदिवासी ते आदिवासी एसटी (भिल्ल) जमाती व्यक्तींना जमीन विक्री करण्यासाठी परवानगी मिळणे बाबत विनंती केली आहे.

अर्जदार यांनी उक्त जमीन विक्री द्वारे श्री. सैराज अन्वर तडवी रा. निंबायती, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर यांचे नावे हस्तांतरण करणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

सदर जमिनीबाबत या कार्यालयाने नियमाप्रमाणे जमीन विक्री परवानगी देण्यास कोणताही प्रकाराचा हितसंबंध, हक्क असणा-या व्यक्तीचा सदर हस्तांतरण व्यवहारास काही आक्षेप असल्यास तक्रार/उजर इत्यादी लेखी स्वरूपात या कार्यालयास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

विहित मुदतीत आक्षेप / तक्रार/उजर इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या हस्तांतरणाच्या व्यवहारास कुणाचाही आक्षेप / उजर नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप / तक्रार इत्यादी विचारात घेतली जणार नाही, याची नोंद घ्यावी.

(विनोद खिरोळकर)

निवासी उपजिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री.व्हि. एन. काटकर सह दिवाणी व फौजदारी न्यायाधिश क. स्तर कन्नड, न्यायालय क्र. ३ जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात**

दि. किरकोळ अर्ज क्र. १३१/२०२४.

अर्जदार : १ वसंत पि. रामभाऊ उर्फ रामराव केशभट वयः ६० वर्षे, धंदाः मजुरी रा. सि.-५६-७-११ वी योजना, संघर्ष नगर सिडको औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद. २ मन्सुब पि. रामभाऊ उर्फ रामराव केशभट वयः ५५ वर्षे, धंदाः मजुरी रा. बिरोळा पो. शिवुर ता. वैजापुर जि. औरंगाबाद. ३ गणेश पि. रामभाऊ उर्फ रामराव केशभट वय: ५२ वर्षे, धंदाः मजुरी रा. बिरोळा पो. शिवुर ता. वैजापुर जि. औरंगाबाद. ह.मु. कनकावती नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४ पंढरीनाथ पि. रामभाऊ उर्फ रामराव केशभट वयः ५० वर्षे, धंदाः मजुरी रा. शिवुर ता. वैजापुर जि. औरंगाबाद.५ बिजलाबाई भ्र. गुलाबराव डोंगरे वय: ६२ वर्षे, धंदाः मजुरी रा. गल्ले बोरगांव ता. खुल्ताबाद जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार -महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद

अर्जः भारतिय वारसा हक्क कायदा १९६६ अम्बये सक्यौशन /वारसाहक्क प्रभाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदारांनी या मा न्यायालयात त्याचे वकिल श्री. बि. जे. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे सख्ख्ये भाऊ असुन अर्जदार क्र.५ हि त्यांची सख्ख्यी बहिण आहे. अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई ग.भा. भामाबाई भ्र. रामभाऊ केशभट हि होती. तिचे मृत्यु पुर्विच पती रामभाऊ उर्फ रामराव केशभट मरण पावले होते. अर्जदार क्र. १ ते ५ यांची आई नामे भामाबाई भ्र. रामभाऊ केशभट हिचा दि.०७/५/२०१७ रोजी बिरोळा ता. वैजापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत भामाबाई ध. रामभाऊ केशभट यांना अर्जदार क्र. १ ते ५ यांचे शिवाय इतर कोणीही कायदेशिर वारसदार नाहीत. मयताचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया या. कन्नड येथे काही स्वकमा शिल्लक आहे त्याचा तपशिल पुढिल प्रमाणे. १. स्टेट बँक ऑफ इंडिया शा. मार्केट यार्ड कन्नड खातेदार भामाबाई भ्र. रामभाऊ केशभट रक्कम रु. ५०,०००/- व्याज सह पर्यंत दि.२२/१२/२०२३ पर्यंत ९०,३३५/- रुपये. फिक्स डिपॉजिट खाते क्र. ६२४४०३७००४७ २. स्टेट बँक ऑफ इंडिया शा. मार्केट यार्ड कन्नड, भामाबाई भ्र. रामभाऊ केशभट रक्कम ४२५१/- बचत खाते क्र. ६२२८७३१२४११

मयताचे नावे वरील प्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया शा. मार्केट यार्ड कन्नड रक्कमा असुन त्या अर्जदार क्र. १ ते ५ यांना मिळणे कामी मा. न्यायालयाचे सक्शेशन प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदारांनी सदरचा अर्ज वारसाहक्क सम्शेशन प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आल्यास त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी स्वरुपाने स्वता अथवा आपल्या विधिज्ञां मार्फत उजर सादर करावा. मुदतित उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदारांचे हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारित करण्यात येतिल.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

सह दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहिर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. ११२/२०२४

अर्जदार : १. मालत शिवशंकर राजपूत, वयः ५४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. चंद्रलोक नगरी, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. राहुल शिवशंकर राजपूत, वयः ३२ वर्षे, धंदाः नोकरी, रा. चंद्रलोक नगरी, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. प्रियंका भ्र. राहुल राजपूत, वयः २३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. हारसवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडीलं नामे शिवशंकर बाबूसिंग राजपूत हे दि. २२/०९/२०२३ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत शिवशंकर बाबूसिंग राजपूत यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २६/०७/२०२४

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहिर प्रगटन

**मा. ए. बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क.स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात**

एम.ए.क.१९३/२०२४

CNR-MHAU080037562024

अर्जदार : १. आशा किसन महाकाळ वय ३६ वर्ष, व्यवसाय शेती रा.मोढा बु. ता.सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २. संजिवनी किसन महाकाळ वय २० वर्ष, व्यवसाय शिक्षण रा. वरील प्रमाणे

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे किसन विठ्ठल महाकाळ हे मौजे मोढा बु. ता.सिल्लोड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होते. त्यांचा दि.१७.०२.२०२४ रोजी मौजे मोढा बु. ता.सिल्लोड येथे मृत्यू झाला आहे. मयताचे अर्जदार क.१ ही पत्नी असून अर्जदार क. २ ही मुलगी आहे. अर्जदार व्यतिरिक्त मयत किसन विठ्ठल महाकाळ यांना इतर कुणीही कायदेशीर वारस नाही. मयत नामे किसन विठ्ठल महाकाळ यांच्या वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार क.१ व २ हेच त्यांचे एकमेव वारसदार आहे. त्यामुळे मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण घडले आहे.

ज्याअर्थी अर्जदार हे मयत नामे किसन विठ्ठल महाकाळ यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०७/०४/२० रोजी माझ्या सही शिन्क्रयानिशी दिले. पुढील तारीख १४/०८/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपिक — सहा अधिक्षक

दिवाणी न्यायालय सिल्लोड

## जाहिर प्रगटन

**मा. ए. बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क. स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात**

एम.ए.क.२३३/२०२४

CNR-MHAU080040492024

अर्जदार : १. प्रियंका तुळशिराम जंजाळ वय ३३ वर्ष, व्यवसाय नौकरी रा. चिंचपुर ता.सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २. संचिता तुळशिराम जंजाळ वय १२ वर्ष, व्यवसाय शिक्षण ३. अजिक्य तुळशिराम जंजाळ वय १० वर्ष, व्यवसाय शिक्षण अर्जदार क. २ व ३ साठी अ.पा.क. आई नामे प्रियंका तुळशिराम जंजाळ वय ३३ वर्ष, व्यवसाय नौकरी व रा. वरील प्रमाणे ४. चंद्रकलाबाई सुखदेव जंजाळ वय सज्ञान, व्यवसाय घरकाम रा. वरील प्रमाणे

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे तुळशिराम सुखदेव जंजाळ हे मौजे चिंचपुर ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होते. त्यांचा दि.२६.०४.२०२१ रोजी मौजे चिंचपुर ता. सिल्लोड येथे मृत्यू झाला आहे. मयताचे अर्जदार क.१ ही पत्नी असून अर्जदार क. २ ही मुलगी असून अर्जदार क. ३ हा मुलगा असून तसेच अर्जदार क.४ आई आहे. अर्जदार व्यतिरिक्त मयत तुळशिराम सुखदेव जंजाळ यांना इतर कुणीही कायदेशीर वारस नाही. मयत नामे तुळशिराम सुखदेव जंजाळ यांच्या वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार क.१ ते ४ हेच त्यांचे एकमेव वारसदार आहे. त्यामुळे मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण घडले आहे. ज्याअर्थी अर्जदार हे मयत नामे तुळशिराम सुखदेव जंजाळ यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०१/०८/२०२४ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. पुढील तारीख ०६/०९/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय सिल्लोड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. व्ही.एन. काटकर मॅडम दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १४३/२०२४ — पुढील तारीख : १०/९ /२०२४

अर्जदार : १- बिलकीस युसूफ सुन्निवोरा, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. चिखलठाण, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद. २- अशपाक युसूफ सुन्निवोरा, वय ३५ वर्षे, धंदा शेती व व्यापार, रा. चिखलठाण, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद ३- अनिस युसूफ सुन्निवोरा, वय २८ वर्षे, धंदा शेती व व्यापार, रा. चिखलठाण, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद. ४- सलमा मोहम्मद इमरान वखारिया, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. रबीया मस्जीत चे बाजुला शिफा हॉस्पीटल जवळ, मंगरुळ, जुनागड गुजरात

- विरुध्द -

गैरअर्जदार : २- महाराष्ट्र शासन, मार्फत- जिल्हाधिकारी औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद

अर्ज : वारताचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. बी. जे. चव्हाण, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार क्रं. १ ते ४ हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार क्रं. १ ते ४ यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून या न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयत फातीमाबी अ. करीम यांची सुन व मयत युसूफ अ.करीम यांची पत्नी आहे, तसेच अर्जदार क्रमांक २ व ३ हे मयत फातिमाबी अ. करीम हिचे नातु व मयत युसूफ अ. करीम यांची मुले आहेत, तसेच अर्जदार क्रमांक ४ ही मयत फातिमाबी अ. करीम हिची नात व मयत युसूफ अ.करीम यांची मुलगी आहे. अर्जदार क्रमांक १ ची सासु फातिमाबी अ. करीम या दिनांक १५.१०.२०१५ रोजी मौजे चिखलठाण ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे मयत झाल्या आहेत, तसेत्त अर्जदार क्रं. १ चे पती नामे युसूफ अ.करीम हे देखील दिनांक २७.१०.२०२१ रोजी मौजे चिखलठाण ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. सोबत दोघांचेही ग्राम पंचायत चिखलठाण ता. कन्नड यांनी दिलेले मृत्यु प्रमाण पत्र या न्यायालयाच्या अवलोकनासाठी दाखल केले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी व विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी अर्जदारांनी वंशावळ देखील दिलेली आहे. उल्लेखीत केल्या प्रमाणे मयतांची वंशावळ असून मयताच्या नावाने मिळणारे शासकीय व निमशासकीय फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या महसुलच्या नोंदी वारस कायदया प्रगाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी अर्जदाराने दिनांक १०.०७.२०२४ रोजी विनंती केली असता महनुल अधिका-यांनी मा. न्यायालयाचे वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याचे सांगीतले आहे, म्हणून सदरील अर्ज करण्यास अर्जदारांना दिनांक १०.०७.२०२४ रोजी कारण घडले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ४ हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांस कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत मौजे चिखलठाण ता. कन्नड येथील रहिवाशी असून त्यांच्या वडीलोपार्जित मिळकती मौजे निमडोंगरी, ता. कन्नड येथील शिवेत जमीन गट क्रमांक १०२ व ११६ मध्ये शेत जमीन असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. अर्जदार क्रमांक १ ते ४ यांनी सदर आशयाचा अर्ज ईतरत्र कुठल्याही न्यायालयात दाखल केलेला नाही. अर्जदार क्रमांक १ ची मयत सासु व अर्जदार क्रमांक २ ते ४ ची आजी नामे फातीमाबी अब्दुल करीम सुत्रीवोरा हिचे अर्जदार क्रमांक १ ते ४ वारस असल्या बाबतचे घोषीत होवून वारस प्रमाण पत्र देणे आवश्यक व न्याय योग्य आहे. सबब वरील प्रमाणे अर्जदार यांनी या न्यायालयात मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळाणे मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, व त्या बाबत इतर कुठल्याही वारसाचा उजर आक्षेप नाही या साठी प्रमाण पत्र देणे आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशिन झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना गयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २९.०७.२०२४ रोजी माझे सहीनिशी न मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : ३१.०७.२०२४

आदेशावरुन

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर कन्नड

## जाहिर प्रगटन

**मा. ए. बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क.स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात**

एम.ए.क.२२७/२०२४

CNR-MHAU080039672024

अर्जदार : १. शिवानी सुनिल फलके वय ०४ वर्ष, व्यवसाय निरंक अ.पा.क. आजी वंदना कौतिक फलके रा. लिहाखेडी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २. वंदना कौतिक फलके वय ४४ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. वरील प्रमाणे ३. कल्याणी सुनिल फलके वय २२ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. वरील प्रमाणे

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत सुनिल कौतिक फलके हे मौजे लिहाखेडी ता. सिल्लोड येथील रहिवाशी होते. त्यांचा दि. २३.०३.२०२३ रोजी मौजे लिहा ता. सिल्लोड येथे मृत्यू झालेला आहे. अर्जदार क. १ शिवानी सुनिल फलके ही मयताची मुलगी असून अर्जदार क. २ ही मयताची आई व अर्जदार क. ३ ही पत्नी आहे. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार हेच मयताचे वारस आहे. तसेच अर्जदार क. १ हिचे पालन पोषण अर्जदार क.२ ही करीत आहे. मयम सुनिल कौतिक फलके यांचे दि.२३.०३.२०२३ रोजी निधन झालेले असून अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी मयत सुनिल कौतिक फलके यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क.१ ते ३ यांनी प्रस्तुत अर्जा व्यतिरिक्त वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत प्रस्तुत मा. न्यायालया व्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केलेला नाही.

ज्याअर्थी अर्जदार हे मयत नामे सुनिल कौतिक फलके यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद यावी

आज दि.०१/८/२०२४ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. पुढील तारीख १४/०८/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय सिल्लोड

## जाहिर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज.क्रं. १३६/२०२४.

पुढील तारीख २९/०८/२०२४.

अर्जदार : १. यशोदा भ्र. नागेश्वर सातदिवे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. देवगांव रंगारी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. तेजश्री पिता नागेश्वर सातदिवे, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्र. १ ३. देवांश पिता नागेश्वर सातदिवे, वय ८ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्र. १

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांना मा. न्यायालयात त्याच्ये विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत अर्ज दिला आहे की, मयत नागेश्वर किसनराव सातदिवे हे मुळचे मौजे देवगांव रंगारी ता. कन्नड येथीलचे रहिवाशी होते. मयतास अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ ही मुलगी असून अर्जदार क्र. ३ हा मुलगा आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे अज्ञान असून अर्जदार क्र. १ ही त्यांची जन्मदाती आई असून अज्ञान पालनकर्ती आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत नागेश्वर किसनराव सातदिवे हे दि.२९/०५/२०२१ रोजी कमल नयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. तसेच मयताची आई शोभाबाई भ्र. किसन सातदिवे ही दिनांक ०८/०४/२०२१ रोजी तर वडील किसन मरिबा सातदिवे हे दिनांक २१/०५/२०२१ रोजी मौजे देवगांव रंगारी येथे मयत झाले आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ यांना मयत नागेश्वर किसनराव सातदिवे यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. मयत नागेश्वर किसनराव सातदिवे हे मौजे देवगांव रंगारी, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक २५/०६/२०२४ रोजी मौजे देवगांव रंगारी ता. कन्नड येथे घडले. त्या अर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :-२/८/२०२४.

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान पी.एम. कोळसे सर सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ट स्तर, कन्नड यांचे न्यायालयातून**

दि.कि.अर्ज नं. १४५/२०२३

अर्जदार : रतन शहदू शिंदे वयः ७५ वर्षे, धंदाः शेती, रा. जेहुर ताः कन्नडे, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन

अर्ज :- वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

मा. महोदय,

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी. डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांची पत्नी नामे चंद्रकलाबाई रतन शिंदे ही दि. ११/०४/२०२३ रोजी मौजे जेहुर ता. कन्नड येथे मयत झालेली आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत चंद्रकलाबाई रतन शिंदे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदर प्रकरणा बाबत कोणासही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अगर आपल्या विधिज्ञा मार्फत हजर राहुन उजर आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार यांच्या हक्कात ते मयत चंद्रकलाबाई रतन शिंदे यांचे वारस असल्याचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दि. १६/१२/२०२३

आदेशावरुन

कनिष्ठ लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-१४ उपविभागीय अधिकानी कार्यालय कन्नड दिनांक २९/०१/२०२४

१. अर्जदार ०:- भारती संतोष वाघ रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

२. गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय निंभोरा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम. १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड टी. डी. शिंदे यांच्या गार्फत अर्ज सादर करून अर्जदाराचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १२/०६/१९८८ रोजी निंभोरा येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक १२/०६/१९८८ रोजी निंभोराः येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कागासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १२/०६/१९८८ रोजी निंभोरा येथे झाल्यांचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाग काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २८/०२/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदबाबा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १२/०६/१९८८ रोजी जन्म आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व गुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २९/०१/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या महीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-४१५ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २४/०७/२०२४

अर्जदार ०:- संजय सांडु निकम रा. सावरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय सावरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड टि. डी. शिंदे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांचे मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ११/०९/२००७ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ११/०९/२००७ रोजी सावरगांव ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ११/०९/२००७ रोजी सावरगांव येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ११/०९/२००७ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/गशाका/जगाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-१८ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक ३१/०७/२०२४

अर्जदार :- सलीम रेहमान शेख रा. करंजखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरवर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय करंगखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड टि. डी. शिंदे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०६/०७/२०२२ रोजी करंजखेडा ता. कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०५/०१/२०२१ रोजी करंजखेडा ता. कन्नड येथे आलेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०५/०१/२०२१ रोजी करंजखेडा ता. कन्नड ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणात्त काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०५/०१/२०२१ रोजी करंजखेडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ३१/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-४१६ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २४/०७/२०२४

अर्जदार ०:- रूषीकेश विलास निकम रा. सावरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय सावरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड टि. डी. शिंदे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०४/१२/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ०४/१२/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०४/१२/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०४/१२/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे जन्म आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-४१७ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २४/०७/२०२४

अर्जदार ०:- रूषीकेश संजय निकम रा. सावरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय सावरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड टि. डी. शिंदे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना

त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक

१४/१०/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक १४/१०/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १४/१०/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १४/१०/२००५ रोजी सावरगांव ता. कन्नड येथे जन्म आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## चौफेर

**सतीश पांडा**



# चर्च-नक्षलवादी यांच्यात साटेलोटे

## सार्वजनिक चर्चेची आवश्यकता

**'संभावनाओंका सूर्योदय' अर्थात 'सनराईज ऑफ पॉसिबिलिटीज' या सत्रात सामाजिक कार्यकर्ते सतीश गोकुळ पांडा यांनी आपले विचार मांडले. त्यातील काही अंश येथे देत आहोत.**

छत्तीसगडच्या नक्षलग्रस्त व अतिशय दुर्गम अशा अबुझमाडच्या अंतर्गत भागात आजपर्यंत कोणतीही सरकारी यंत्रणा पूर्णपणे पोहोचू शकली नाही. मात्र, असे असूनही तेथे फक्त ख्रिश्चन मिशनरी व चर्चला मात्र मुक्त प्रवेश आहे. त्यामुळेच नक्षलवाद आणि चर्च यांच्यात नेमके काय साटेलोटे आहे यावर चर्चा व्हायलाच हवी. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नक्षलवाद्यांच्या उच्च कॅडर आणि कनिष्ठ कॅडरमध्ये संघर्ष आहे. उच्च कॅडर मुख्यत: तेलंगणा किंवा आंध्र प्रदेशातील आहे, त्यांना मूळ संस्कृतीशी काहीही देणेघेणे नाही. मात्र, जो कनिष्ठ संवर्ग (कॅडर) आहे तो स्थानिक आहे. स्वत:च्या संस्कृतीवर, पूजा उपासनापद्धतीवर चर्चकडून होणाऱ्या वैचारिक हल्ल्यांमुळे हे कनिष्ठ कॅडर चिंतित आहे.

कनिष्ठ कॅडरची चर्चला सहकार्य करण्याची इच्छा नसते. याऊलट वरिष्ठ किंवा उच्च कॅडरला चर्चला सहकार्य करायचे असते. कारण त्याला धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात. नक्षलवादी लहान मुलींचे शारीरिक शोषणही करतात, हे कित्येकदा उघडकीस आले आहे. अबुझमाड परिसरात अशी अनेक गावे आहेत, जिथे पालकांना आपल्या मुलींना त्यांच्या इच्छेविरुद्ध नक्षलवाद्यांकडे सोपवावे लागते. या मुलींना प्रेम करण्यास अथवा विवाह करण्यास परवानगी नाही. काही कारणाने विवाह झाला तरी मूल जन्माला घालण्याची परवानगी नाही. काही वर्षांपूर्वी नारायणपूरजवळील एका गावात नक्षलवाद्यांनी किशोरवयीन मुला-मुलींना बळजबरीने कॅडरमध्ये समाविष्ट केले. त्यांचे आपसात प्रेम जुळल्यावर त्यांना जिवंत जाळण्यात आले. परिसरात कोणाकडे ट्रॅक्टर असल्यास नक्षलवादी वर्षाला २० हजार रुपये कर वसूल करतात. दुकाने, बाईक इत्यादींचा वसुलीचा 'दर' निश्चित केला आहे. जर नक्षलवाद्यांना त्या भागात १०० टक्के मतदान हवे असेल तर तेवढे मतदान होते. पण जर मतदान होऊ नये, असे त्यांना वाटत असेल, तर तसेही होते. नक्षलवादी जे काही म्हणतील, जे सांगतील तो कायदा होतो. छत्तीसगडमध्ये जनजाती समाजाचा एक मोठा वर्ग आहे आणि हा वर्ग सनातन संस्कृतीचा गाभा आहे. परंतु त्यांना जनगणनेतील धर्म कॉलममध्ये 'अन्य' असे लिहिण्यास प्रोत्साहन देण्यात आले. हे काम येथील चर्चशी संबंधित मंडळींनी केले. येथे नियोजित पद्धतीने जनजाती अर्थात वनवासी समाजाला प्रथम त्याच्या धर्मापासून दूर केले जाते आणि नंतर त्यांचे धर्मांतर केले जाते.

अमेरिकेत बाहेरून आलेल्या लोकांनी अर्थात वसाहतवादी मानसिकतेच्या गोऱ्या लोकांनी तिथल्या मूळ, स्थानिक वंशाच्या रहिवाशांची हत्या केली. त्यामुळे दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. ही परंपरा आपल्या देशातही सुरू करण्यात आली. राज्यघटनेत आदिवासी या शब्दाचा उल्लेख नाही, तिथे जनजाती हा शब्द वापरण्यात आला आहे. त्यासाठी आम्ही एक अभियान सुरू करून एक कार्ड जारी केले. त्यावर लिहिले होते की आम्ही सर्व भारतवासी मूळ निवासी आहोत.

बस्तरमध्ये एका व्यक्तीने व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये या अभियानाविषयी लिहिले तेव्हा त्याला ५०० लोकांनी घेरले आणि त्याला ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. तसेच माफी मागण्यास भाग पाडले. जनजाती समाजाची दिशाभूल करण्यासाठी 'रावण हा वनवासींचा राजा आहे, दंडकारण्य ही त्याची राजधानी होती आणि महिषासुर हा त्यांचा पूर्वज आहे,' अशी आणखी एक खोटी कथा (नॅरेटिव्ह) रचण्यात आली. छत्तीसगडची प्रतिमा डागाळण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला, जणू काही तिथे भुकेल्या नग्न लोकांचे राज्य आहे. काही लोक विचारतात की तेथील लोक घरात राहतात की जंगलात? कपडे घालता की नाही? काही लोकांच्या मनात अशीही प्रतिमा आहे की, तुम्ही रायपूर विमानतळावर उतरताच नक्षलवादी तुम्हाला गोळ्या झाडतील.

प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र नेमकी उलटी आहे. सीता बेंगराच्या गुहेस जगातील सर्वांत प्राचीन नाट्यगृह मानले जाते. छत्तीसगड हे प्राचीन भारतातील १६ महाजनपदांपैकी एक मानले जाते. कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातही छत्तीसगड आघाडीवर आहे. जेव्हा आपण छत्तीसगडच्या समाजाकडे पाहतो तेव्हा त्यांचा साधेपणा आणि त्यांची उत्स्फूर्तता पाहून ते बौद्धिकदृष्ट्या मागास असल्याची प्रतिमा आपण तयार करतो. परंतु तसे मुळीच नाही. जेव्हा वारंवार छत्तीसगडचे नकारात्मक पैलू मांडले जातात तेव्हा स्थानिकांच्या मानसिकतेवर त्याचा परिणाम होतो. आमचे राज्य विकसित होण्याचा पूर्णपणे प्रयत्न करीत आहे. राज्याचा विकास करण्यासाठी शक्य ते प्रयत्न पूर्ण क्षमतेने करण्यात येत आहेत, सरकारही प्रयत्न करीत आहे. यासाठी प्रत्येकाने छत्तीसगडची योग्य व सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे अपेक्षित आहे. छत्तीसगडकडे पूर्वग्रहदूषित नजरेने बघू नये. दिल्लीत बसून छत्तीसगडबद्दल लिहिण्यात येते. एकदा छत्तीसगडला भेट द्या, या राज्याला, येथील लोकांना समजून घ्या आणि मगच त्याबद्दल लिहा, अशी माझी सर्वांनी विनंती आहे.

## आरोग्य

**महक सिंह**

# 'या' आजारांवर फायदेशीर आहे बडीशोप

**बडीशोपला भारतीयांच्या स्वयंपाकघरात महत्त्वाचे स्थान आहे. हा मसाल्यातील एक महत्त्वाचा घटक पदार्थ आहे. बडीशोपचा वापर सामान्यत: भोजनाची चव आणि सुगंध वाढवण्यासाठी केला जातो, परंतु आरोग्याच्या दृष्टीनेही याचे खूप फायदे आहेत.**



बडीशोपला भारतीयांच्या स्वयंपाकघरात महत्त्वाचे स्थान आहे. हा मसाल्यातील एक महत्त्वाचा घटक पदार्थ आहे. बडीशोपचा वापर सामान्यत: भोजनाची चव आणि सुगंध वाढवण्यासाठी केला जातो. परंतु आरोग्याच्या दृष्टीनेही याचे खूप फायदे आहेत. आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला बडीसोप खाण्याचे आरोग्यदायी फायदे सांगणार आहोत.

### बडीसोपचे अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म

बडीशोपमध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात जे तोंडातील बॅक्टेरियाची वाढ रोखतात, ज्यामुळे श्वासाची दुर्गंधी दूर होते.

### पचन सुधारते

बडीशोपचे सेवन केल्याने अपचन, गॅस, पोटाला फुगारा येणे यासारख्या पचन समस्यांपासून आराम मिळतो. बडीशोपचे बीज चघळल्याने पचनक्रिया सुधारते आणि भोजनानंतर आराम वाटतो.

### रक्त शुद्धीकरण

बडीशोप नियमित सेवन केल्याने रक्त शुद्ध होते, ज्यामुळे त्वचा उजळते आणि त्वचेच्या विविध आजारांपासून बचाव होतो.

### संप्रेरक (हार्मोन) संतुलन

महिलांमध्ये हार्मोनल संतुलन राखण्यासाठी बडीशोप उपयुक्त आहे. ती मासिक पाळीची अनियमितता दूर करते.

### श्वसन समस्यांवर गुणकारी

बडीशोप वापरल्याने खोकला, दमा आणि ब्रॉंकायटिस यांसारख्या श्वसनाच्या समस्यांमध्ये आराम मिळतो. त्याचे दाहक-विरोधी गुणधर्म श्वसनमार्गाला शांत करतात.

### वजन कमी करण्यासाठी उपयुक्त

बडीशोपचे सेवन केल्याने भूक नियंत्रित राहते आणि चयापचयाची (मेटाबॉलिझम) क्रिया वाढते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

### दृष्टी सुधारते

बडीशोपमध्ये व्हिटॅमिन ए आणि सी असते, ज्यामुळे दृष्टी सुधारते आणि डोळ्यांच्या समस्यांपासून बचाव होतो.

### बडीशोपचे सेवन कसे करावे

**बीज चघळणे :** भोजनानंतर बडीशोपचे काही बीज चावून खा. यामुळे केवळ श्वासाची दुर्गंधीच दूर होते असे नाही तर पचनक्रियाही सुधारते.

**बडीशोपचा चहा :** एक कप गरम पाण्यात एक चमचा बडीशोप घाला आणि १० मिनिटे तसेच राहू द्या. नंतर ते पाणी गाळून प्या. हे पचन आणि श्वसनाच्या समस्यांवर फायदेशीर आहे.

**बडीशोप पावडर :** बडीशोप बारीक करून तिची पावडर बनवा आणि या पावडरचा आपल्या भोजनात समावेश करा किंवा थेट पाण्यासोबत सेवन करा.

## घरवापसी

**कुलदीप सिंह**



# जबलपूरमध्ये दोन मुस्लिमांचा हिंदू धर्मात प्रवेश

**अजीजुल झाला अनय, तर अल्लारखा बनला विजय**

सनातन धर्माला महान, श्रेष्ठ म्हटले जाते ते उगीच नाही. जो एकदा वैदिक सनातन हिंदू धर्माला जाणून घेण्याचा मनापासून प्रयत्न करतो तो त्या धर्माला चिकटून राहतो. अशीच एक घटना मध्य प्रदेशातील जबलपूरमधून समोर आली आहे. जिल्ह्यात सनातन धर्मावर श्रद्धा असलेल्या दोन मुस्लिम तरुणांनी वैदिक विधी करून घरवापसी केली आहे. अजीझुल हसन आणि अल्लारखा अशी घरवापसी केलेल्या दोन मुस्लिमांची नावे आहेत. शनिवारी हे दोन्ही तरुण सनातन धर्मात परतले. आमची लहानपणापासूनच सनातन धर्मावर श्रद्धा होती आणि त्यानुसार आम्ही विचारपूर्वक सनातन हिंदू धर्म स्वीकारला आहे, असे घरवापसी केल्यानंतर या दोघांनी सांगितले. या दोन्ही तरुणांना हिंदू संघटनांनी मदत केली.

### काय आहे संपूर्ण प्रकरण

सनातन धर्मात परतलेला अजीजुल हसन हा राज्यातील अशोकनगर जिल्ह्यातील रहिवासी आहे. आता घरवापसी केल्यानंतर त्याने आपले नाव बदलून अनय ठाकूर केले आहे. 'मी जबलपूरच्या सरस्वती शिशू मंदिरातून शालेय शिक्षण घेतले. लहानपणापासूनच शाळेत सर्वधर्मसमभावाची भावना बिंबविण्यात आली. सनातन धर्माची शाश्वत मूल्ये, संस्कार मला शिकविण्यात आले. यातून प्रेरित होऊन मी इस्लाम सोडून घरवापसी करण्याचा निर्णय घेतला, असे अजीजुल याने सांगितले.

तर दुसरा अल्लारखा खान हा जबलपूरचा रहिवासी असून घरवापसी केल्यानंतर त्याने आपले नाव बदलून विजय चौहान असे ठेवले आहे.

ख्रिश्चन आणि मुस्लिम दोघेही पूर्वी हिंदूच होते आणि काही कारणास्तव त्यांचे धर्मांतर करण्यात आले. पण, ज्यांना आपले पूर्वज हिंदू होते याची स्पष्ट जाणीव आहे ते घरवापसी करीत आहेत, असे हिंदू संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# एकाच कुटुंबातील पाच सदस्यांची घरवापसी

**मध्य प्रदेशची आर्थिक राजधानी इंदूरमध्ये एकाच कुटुंबातील पाच सदस्यांनी ख्रिश्चन धर्माचा त्याग करून वैदिक सनातन हिंदू धर्मात घरवापसी केली आहे. आता त्यांची नावे बदलली असून एंजलचा आर्यन झाला असून रोझीने बुलबुल हे नाव धारण केले आहे. मेरीची उषा झाली असून रोनाल्ड आता राहुल बनला आहे तर रुहीने ऋतू हे नाव धारण केले आहे.**



**स्वीकारला सनातन धर्म, एंजलचा झाला आर्यन**

**डॉ. मयंक चतुर्वेदी**

**मध्य** प्रदेशची आर्थिक राजधानी असलेल्या इंदूरमध्ये एक संपूर्ण कुटुंब ख्रिश्चन धर्मातून सनातन धर्मात परतले आहे. यावेळी एका ख्रिश्चन कुटुंबातील पाच जणांनी आपला धर्म बदलून हिंदू धर्म स्वीकारला आहे. पती-पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे.

हे सर्वजण मूळचे देवास येथील असून काही काळापासून खजराना येथे राहत होते. आमच्यावर सनातन हिंदू धर्माचा खूप भारतातील प्रभाव आहे, त्यामुळेच आम्ही घरवापसी केली आहे, असे या कुटुंबीयांचे म्हणणे आहे. गुरुवारी सकाळी ११.३० वाजता खजराना येथील पाटीदार धर्मशाळेत एक ख्रिश्चन कुटुंब दाखल झाले. येथे विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांचे शुद्धीकरण करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी सनातन हिंदू धर्म स्वीकारला. हवन-पूजनानंतर सर्वांनी खजराना येथील मंदिर गाठून श्रीगणेशाचे दर्शन घेतले. आता त्यांची नावे बदलली असून एंजलचा आर्यन झाला असून रोझीने बुलबुल हे नाव धारण केले आहे. तर मेरीची उषा झाली असून रोनाल्ड आता राहुल बनला आहे तर रुहीने ऋतू हे नाव धारण केले आहे. यातील रोझी तीन वर्षांची आहे.

यापूर्वी गेल्या अडीच महिन्यांत इंदूरमध्ये घरवापसीचे तीन कार्यक्रम झाले आहेत, हे उल्लेखनीय. आता ५० हून अधिक मुसलमानांनी सनातन धर्म स्वीकारला आहे. सर्व कार्यक्रम खजराना गणेश मंदिरातच झाले. या चौथ्या कार्यक्रमात प्रथमच एका ख्रिश्चन कुटुंबाने हिंदू धर्म स्वीकारला आहे.

(पांचजन्यवरून साभार)

## प्रेरणा

**श्वेता गोयल**



# लोकमान्य टिळक आणि स्वराज्याचा लढा

**लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त**

**बाळ गंगाधर टिळक हे अशा सुरुवातीच्या राष्ट्रवादी नेत्यांपैकी एक होते, ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात आधुनिक विचारधारा आणि धोरणांचा समावेश करून स्वातंत्र्यलढ्याची दिशाच बदलवून टाकली.**

थोर भारतीय नेते, भारतीय असंतोषाचे जनक, भगवद्गीतेचे आधुनिक भाष्यकार, प्राच्यविद्या पंडित, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील चिखलगाव (तालुका दापोली) येथे २३ जुलै १८५६ रोजी एका सुसंस्कृत मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे जन्मनाव केशव असे होते. परंतु, बाळ हेच नाव पुढे रूढ झाले. ते एक विद्वान, गणिततज्ज्ञ, तत्वज्ञानी, प्रखर राष्ट्रवादी, स्वदेशी आणि स्वराज्याचे महान उपासक शिक्षक आणि पत्रकार तर होतेच पण असे जबरदस्त स्वातंत्र्ययोद्धे होते की ज्यांनी बलाढ्य ब्रिटिश सत्तेला उघडपणे आव्हान देऊन अभूतपूर्व अशी चळवळ उभारली आणि भारताच्या स्वातंत्र्याचा पाया रचला. लोकमान्य टिळकांनी उभ्या केलेल्या स्वातंत्र्य आंदोलनाची पायवाट धरतच भारतीयांनी ही चळवळ पुढे नेली.

हिंदू प्रतीकात्मकता आणि प्रखर, पराक्रमी मराठा इतिहासाविषयीच्या त्यांच्या सक्रियतेने लक्षावधी लोकांना प्रेरणा दिली, ज्यामुळे ते आयुष्यभर ब्रिटिश सरकारच्या डोळ्यात खुपत होते. 'ब्रिटिश राजवटीचा सर्वांत प्रबळ व धोकादायक शत्रू' अशी त्यांची नोंद ब्रिटिश नोकरशाहीने केली होती, यावरून लोकमान्य टिळकांनी उभारलेल्या प्रखर स्वातंत्र्यलढ्याची कल्पना यावी. त्यांच्यावर राजद्रोहाचा खटलाही चालवला गेला, ज्यामुळे त्यांची लोकप्रियता अनेक पटींनी वाढली आणि त्यांना 'लोकमान्य' ही उपाधी मिळाली. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे त्यांना महात्मा गांधींनी 'आधुनिक भारताचा निर्माता' आणि जवाहरलाल नेहरूंनी 'भारतीय क्रांतीचे जनक' ही उपाधीही दिली होती. भारतीय संस्कृती आणि सभ्यता हीन मानल्याबद्दल टिळकांनी अनेकदा ब्रिटिश सरकारवर कठोर टीकाही केली होती. त्यांनी २० ऑक्टोबर १८९३ रोजी पुण्यातील आपल्या केसरीवाडा नामक निवासस्थानातून दहा दिवसीय गणेशोत्सवाचा शुभारंभ बनला, जो लवकरच राष्ट्रीय एकात्मतेचा उत्सव बनला.

बाळ गंगाधर टिळक यांचे शिक्षण पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये झाले. येथे त्यांनी १८७६ मध्ये गणित आणि संस्कृतमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी कायद्याचा अभ्यास केला आणि १८७९ मध्ये मुंबई विद्यापीठातून पदवी प्राप्त केली. कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पुण्यातील एका खाजगी शाळेत गणिताचे अध्यापन करण्याचा निर्णय घेतला आणि ही शाळाच त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा मुख्य आधार बनली. काही काळानंतर त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि सर्वसामान्य लोकांना खासकरून इंग्रजी भाषेत शिक्षण देण्याच्या उद्देशाने १८८४ मध्ये एक विद्यापीठ महाविद्यालयात विकसित केले. किंबहुना, त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी इंग्रजी भाषा ही उदारमतवादी आणि लोकशाही आदर्शांच्या प्रसारासाठी एक मजबूत शक्ती मानली. संस्थेच्या आजीव सदस्यांनी नि:स्वार्थ सेवेचा आदर्श पाळावा अशी लोकमान्य टिळकांची अपेक्षा होती. परंतु संस्थेचे काही आजीवन सदस्य बाह्य कमाई स्वत:कडे ठेवत असल्याचे लक्षात येताच त्यांनी संस्थेचा राजीनामा दिला आणि लोकांमध्ये राजकीय जाणीव जागृत करण्याची मोहीम सुरू केली. यासाठी मराठीत 'केसरी' आणि इंग्रजीत 'द मराठा' या दोन साप्ताहिकांचे प्रकाशन त्यांनी सुरू केले. या वृत्तपत्रांचे संपादन ते स्वत: करायचे. बाळ गंगाधर टिळक यांनी आपल्या दोन्ही वृत्तपत्रांद्वारे पाश्चात्त्यांच्या प्रभावाखालील सुधारणावाद्यांवर कडाडून टीका केली. हे सुधारणावादी पाश्चात्त्यांच्या धर्तीवर सामाजिक सुधारणा आणि घटनात्मक धर्तीवर राजकीय सुधारणांचा पुरस्कार करीत होते. मात्र, या स्वाभिमानशून्य व ब्रिटिशांची लाचारी पत्करणाऱ्या आणि पाश्चात्त्यांच्या ओंजळीने पाणी पिणाऱ्या नेमस्त सुधरणावाद्यांवर लोकमान्यांनी आपल्या लेखणीतून घणाघाती टीका केली. टिळकांच्या या प्रखर आणि सडेतोड लेखांमुळे ते देशभर खूप प्रसिद्ध झाले.

टिळकांच्या विविध उपक्रमांनी भारतीय जनतेला जागृत करण्यात मोठी भूमिका बजावली आणि त्यामुळेच त्यांचा थेट ब्रिटिश सरकारशी संघर्ष झाला. यामुळेच ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालवला आणि १८९७ मध्ये त्यांची रवानगी तुरुंगात केली. राजद्रोहाचा खटला आणि शिक्षेनंतर तर ते अधिकच लोकप्रिय झाले आणि याच खटल्यामुळे आणि शिक्षेमुळे त्यांना 'लोकमान्य' ही उपाधी मिळाली. सुमारे १८ महिने शिक्षा भोगल्यानंतर त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली.

१९०५ मध्ये भारताचा व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी केली तेव्हा टिळकांनी फाळणी रद्द करण्याच्या बंगालच्या मागणीला पूर्णपणे पाठिंबा दिला आणि ब्रिटिश वस्तूंवर कडकडीत बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले. अल्पावधीतच टिळकांची स्वदेशी आणि ब्रिटिशांच्या वस्तूंवर बहिष्कार ही चळवळ देशभर पसरली. ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले तर भारतीयांनी त्यांना स्वातंत्र्य लढ्याचे जनक मानले, जे भारतात स्वराज्य किंवा स्व-शासनाच्या मागणीसाठी खंबीरपणे उभे राहिलेल्या प्रारंभिक नेत्यांपैकी एक होते. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत एकदा ब्रिटिश लेखक सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले होते.

उदारमतवादी भारतीय राष्ट्रीय काँग्रेससाठी टिळकांचा दृष्टिकोन एक मजबूत आव्हान होता. तेव्हा काँग्रेसवर मवाळांचे, उदारमतवादी नेत्यांचे वर्चस्व होते. हे मवाळ नेते अगदी लहानसहान सुधारणांसाठीही ब्रिटिश सरकारपुढे हात पसरून आपल्या निष्ठेचे प्रदर्शन करीत होते. ब्रिटिश सरकारची मर्जी सांभाळणे, परकीय राज्यकर्त्यांविरुद्ध कठोर भूमिका न घेता त्यांची लाचारी पत्करणे यामुळे मवाळांच्या ताब्यातील काँग्रेस प्रभावहीन झाली होती. काँग्रेसमधील मवाळ, उदारमतवादी नेत्यांचा सामाजिक सुधारणांवर अधिक भर होता. तर टिळकांचा असा विश्वास होता की राजकीय सुधारणा झाल्या की आपोआपच सामाजिक सुधारणा देखील घडून येतील. आताच सामाजिक सुधारणांच्या मागे लागलो तर राजकीय स्वातंत्र्य कधीच मिळणार नाही आणि सामाजिक सुधारणांच्या लढ्यातच भारतीयांची संपूर्ण ऊर्जा नष्ट होईल. त्यामुळे आधी राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे, असा लोकमान्यांचा सुस्पष्ट दृष्टिकोन होता. स्पष्टच सांगायचे झाल्यास लोकमान्य टिळकांचे ध्येय संपूर्ण स्वराज्य किंवा स्वातंत्र्य प्राप्त करणे हे होते, केवळ लहानसहान सुधारणा करणे नाही. म्हणून त्यांनी काँग्रेस पक्षाला जहाल व आक्रमक कार्यक्रम स्वीकारण्यासाठी राजी करण्याचा प्रयत्न केला. १९०७ मध्ये सूरत येथे काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय बैठकीत त्यांचा या मुद्यावरून पक्षाच्या काही प्रमुख उदारमतवादी नेत्यांशी संघर्ष झडला, परिणामी काँग्रेसमध्ये जहाल आणि मवाळ अशी फूट पडली. राष्ट्रवादी शक्तींमधील विभाजनाचा फायदा घेऊन ब्रिटिश सरकारने पुन्हा टिळकांवर राजद्रोहाचा आणि ब्रिटिश सरकारविरुद्ध जनतेत असंतोष पसरविण्याच्या आरोपाखाली खटला भरण्यात आला आणि यावेळी त्यांना मंडाले, ब्रह्मदेश (म्यानमार) येथे ६ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. मंडाले येथील तुरुंगात असतानाच लोकमान्य टिळकांनी 'द ओरायन' 'गीतारहस्य' आणि 'आर्क्टिक होम इन वेदाज' आणि 'वेदिक क्रोनॉलॉजी' यासारखी प्रसिद्ध पुस्तकेही लिहिली. पहिल्या महायुद्धाच्या पूर्वसंध्येला १९१४ मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर टिळक पुन्हा राजकारणात सक्रिय झाले. त्यांनी २८ एप्रिल १९१६ रोजी बेळगाव येथे 'होमरूल लीग'ची स्थापना केली. कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांच्या धर्तीवर ब्रिटीश साम्राज्यात भारतासाठी होम रूल किंवा भारताच्या प्रभुत्वाचा दर्जा (डोमिनियन) मिळवणे हे होमरूल चळवळीचे उद्दिष्ट होते. होमरूल चळवळीच्या काळातच लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' ही लोकप्रिय घोषणा दिली. ही चळवळ १९१६ ते १९१८ दरम्यान सुमारे दोन वर्षे चालली. इंग्रजी बोलणाऱ्या उच्चशिक्षित भारतीयांसाठी डॉ. ॲनी बेझंट आणि बाळ गंगाधर टिळक यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीचे व्यासपीठ तयार केले असे मानले जाते. १९२० मध्ये ऑल इंडिया होम रूल लीगचे नाव बदलून 'स्वराज्य सभा' असे ठेवण्यात आले. भारतीयांनी परकीय राजवटीला सहकार्य करणे थांबवावे असे म्हणणाऱ्यांपैकी टिळक हे पहिले होते. परंतु हिंसाचाराला प्रोत्साहन दिल्याचे त्यांनी स्पष्टपणे नाकारले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे बाळ गंगाधर टिळक यांचे १ ऑगस्ट १९२० रोजी निधन झाले.

(पांचजन्यवरून साभार)

## अग्रलेख...

# कठोर कारवाई व्हावी

देशाच्या शिक्षण क्षेत्रात भारताची गौरवशाली प्राचीन परंपरा आणि संस्कृतीसोबत आधुनिकीकरणाचा संगम साधणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रवेश होत असताना काही हितसंबंधी आणि स्वार्थी वृत्तीचे लोक त्याला जाणीवपूर्वक गालबोट लावण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. शिक्षण क्षेत्राबद्दल मोदी सरकार विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी अतिशय संवेदनशील आहेत. विद्यार्थ्यांबद्दल त्यांना आपुलकी आणि जिव्हाळा आहे. त्यामुळेच ते गेल्या काही वर्षांपासून इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या आधी 'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमातून मोदी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, पेपर कसा सोडवावा, परीक्षेमुळे उद्भवणाऱ्या ताणतणावाचा सामना कसा करावा, याबाबत मार्गदर्शन करीत असतात. एवढेच नाही तर शिक्षक आणि पालकांच्या प्रश्नांचे शंकासमाधानही करीत असतात. यावेळची मोदी यांची भूमिका एखाद्या आजोबाने आपल्या नातवाला प्रेमाने जवळ घेऊन समजवावे, अशी असते. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरू यांना लहान मुलांबद्दल वाटत असलेल्या जिव्हाळा आणि आपुलकीचे गोडवे गायले जात होते. 'चाचा नेहरू' म्हणून त्यांचे वर्णन केले जात होते; पण मोदी यांनी त्यांना केव्हाच मागे टाकले. आज देशातील लोकांमध्येच नाही तर लहान मुले आणि विद्यार्थ्यांमध्ये मोदी सर्वात लोकप्रिय आहेत, यात शंका नाही. मात्र, मोदी यांचे शिक्षण क्षेत्र आणि विद्यार्थ्यांबद्दल असलेल्या या भूमिकेमुळे काही शक्तींच्या पोटात दुखू लागले आहे, असे दिसते. त्यामुळे मोदी सरकारसोबत शिक्षण क्षेत्राला बदनाम करण्याचे षडयंत्र त्यांनी रचले. मध्यंतरी नीट परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण गाजले. वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेला देशभरातील लाखोंच्या संख्येत विद्यार्थी बसतात. या परीक्षेचा पेपर देशाच्या कानाकोपऱ्यातील कोणत्या तरी गावात फुटला, त्याचा फायदा म्हणा गैरफायदा शेदोनशे विद्यार्थ्यांना झाला. त्यावरून विरोधकांनी रान उठवले. देशभर या परीक्षेचे पेपर फुटले, असा कांगावा करत संपूर्ण परीक्षा रद्द करीत नव्याने ही परीक्षा घेण्याची मागणी केली. यानिमित्ताने मोदी सरकारवर जी टीका करण्यात आली, ती वेगळीच. जणू मोदी सरकारने वा त्या सरकारमधील कोणा मंत्र्याने नीट परीक्षेचा पेपर फोडला, असे वातावरण देशभरात तयार करण्यात आले. मोदी सरकारला यानिमित्ताने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची संधी विरोधकांनी साधून घेतली. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षेचा पेपर फुटला नाही, त्यामुळे परीक्षा रद्द करण्याचा वा नव्याने परीक्षा घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असा निकाल देत विरोधकांच्या आरोपातील हवा काढून घेतली. एकप्रकारे विरोधकांच्या कानशिलात सणसणीत लगावली. मागील आठवड्यात राजधानी दिल्लीच्या ओल्ड राजेंद्रनगर भागात युपीएससी परीक्षेच्या शिकवणी वर्गाच्या तळघरात पावसाचे आणि ड्रेनेजचे पाणी शिरल्यामुळे झालेल्या अनपेक्षित आणि धक्कादायक घटनेत तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला; एकप्रकारे त्यांना जलसमाधी मिळाली. या घटनेने देशभरातील लोकांना धक्का बसला. आयएएस होऊन देशाच्या सेवेचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नावर या पावसाने पाणी फेरले. या घटनेवरूनही राजकीय आरोप-प्रत्यारोप झाले. जणू ही घटना मोदी सरकारमुळेच घडली, असे वातावरण निर्माण करण्यात आले.

खरं म्हणजे या घटनेची जबाबदारी दिल्ली सरकारची होती. ड्रेनेजची योग्य व्यवस्था राजेंद्रनगर भागात असती, तर ही घटना घडलीच नसती. आज दिल्लीतच नव्हे तर देशाच्या अनेक भागात शिकवणी वर्गांचे अमाप पीक आले आहे. हजारो नाही तर लाखो विद्यार्थी शिकवणी वर्गात येत असतात. यातून काही हजार कोटींची बाजारपेठ तयार झाली आहे. शिकवणी वर्गांसाठी इमारती बांधताना कोणत्याच नियमांचे पालन केले जात नाही. वीज मंडळ आणि अग्निशामक दल असो की सरकारच्या अन्य सर्व यंत्रणा डोळे बंद करून आर्थिक फायद्यावर डोळा ठेवत हा सारा बेकायदेशीर प्रकार खपवून घेत असतात. मुळात ज्या तळघरात म्हणजे बेसमेंटमध्ये पाणी शिरले, तेथे लायब्ररी तयार करण्यात आली होती. या खुराड्यासारख्या लायब्ररीत ५०-६० विद्यार्थी अभ्यास करीत होते. या ठिकाणी लायब्ररी तयार करण्याची परवानगीच नव्हती. पडित सामान ठेवण्यासाठी जागा म्हणून हे तळघर बांधत आहे, असे सांगण्यात आले. सरकारच्या संबंधित खात्यांनी आज्ञाधारक विद्यार्थ्यांप्रमाणे त्यावर विश्वास ठेवला. आमच्या देशात सगळ्याच शासकीय यंत्रणांना आग लागल्यानंतर जाग येते, पण आग लागूच नये म्हणून काही उपाययोजना आपल्याला कराव्या लागतात; ती आपली जबाबदारी आहे, त्यासाठीच सरकारकडून आपल्याला पगार मिळतो, याचे भान कोणाला राहात नाही. मध्यंतरी दिल्लीत आणि देशाच्या अन्य भागातही शिकवणी वर्गाला लागलेल्या आगीत काही विद्यार्थ्यांना आपले जीव गमवावे लागले होते. घटना घडल्यानंतर आपल्या देशातील शासकीय यंत्रणांना जाग येते आणि त्याठिकाणचे बांधकाम बेकायदेशीर होते, अग्निशामक दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र त्यांनी घेतले नव्हते, असा स्वत:च्या बचावाचा युक्तिवाद केला जातो. मात्र, यातून शासकीय यंत्रणांचा निष्काळजीपणा आणि बेफिकिरीही दिसून येते. राजधानी दिल्लीच्या करोलबाग आणि ओल्ड राजेंद्रनगर भागात विद्यार्थी ज्या वातावरणात राहतात, ते पाहून अंगावर काटा येतो. राजधानी दिल्लीत जर अशी परिस्थिती असेल तर देशाच्या अन्य भागात काय परिस्थिती असेल, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. भ्रष्टाचाराने देश पोखरून टाकला आहे. त्यामुळे या देशात सर्वसामान्य माणसाच्या जिवाची कोणाला पर्वा नाही. तो मेला काय आणि जगला काय, याचे कोणाला सोयरसुतक नाही. मृतांच्या कुटुंबीयांना लाख-दोन लाखांची नुकसान भरपाई दिली की, आपली जबाबदारी संपली, असे सर्वांना वाटत असते. त्यामुळे अशा घटनेसाठी बेकायदेशीर बांधकाम करणारे जेवढे जबाबदार आहे, तेवढेच या बेकायदेशीर बांधकामाकडे दुर्लक्ष करणारेही जबाबदार असतात, हे आपल्याला विसरता येणार नाही. अशा घटनांसाठी दोषींना या प्रकरणात आरोपी करताना संबंधित सरकारी यंत्रणेतील अधिकाऱ्यांना सहआरोपी करण्याची गरज आहे. त्यांच्यावरही फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे.

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणाने देशातील जनतेला दुसरा धक्का बसला आहे. खेडकर प्रकरणाने देशातील सनदी सेवांसाठी परीक्षा घेणारी केंद्रीय लोकसेवा आयोगाची (युपीएससी) यंत्रणा संशयाच्या घेऱ्यात सापडली. युपीएससीने पूजा खेडकर यांचे आयएएस पद रद्द केले तसेच भविष्यात त्या अशा कोणत्याही परीक्षेला बसू शकणार नाही, असा आदेश दिला. आतापर्यंत देशातील सर्व आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांकडे अतिशय आदराने पाहिले जात होते, पण पूजा खेडकर प्रकरणाने जनमानसात या सर्व अधिकाऱ्यांबद्दल कारण नसताना संशयाचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण केले आहे. प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी असताना पूजा खेडकर यांनी जो गोंधळ घातला, तमाशा केला, तो पाहात उद्या त्या स्थायी स्वरूपाच्या आयएएस अधिकारी झाल्या असता तर त्यांनी किती आणि कसा हैदोस घातला असता, याची कल्पनाही करवत नाही. एक सडका आंबा टोपलीतील सर्व आंबे सडवतो, तसा हा प्रकार म्हटला पाहिजे. आयएएस अधिकाऱ्याच्या संघटनेनेही या प्रकरणाचा धडा घेत असा कोणताही सडका आंबा आपल्यामध्ये येणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. पूजा खेडकर यांचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने फेटाळला आहे. त्यामुळे त्यांना अटक होईल, हे निश्चित आहे. अटकेच्या भीतीने त्या देशाबाहेर पळून गेल्याची चर्चा आहे. पूजा खेडकर यांनी आपल्या कृतीने आपले स्वत:चे तर नुकसान केले; पण युपीएससी, आयएएस अधिकारी तसेच देशातील प्रशासकीय यंत्रणेचे कधीही भरून न निघणारे नुकसान केले. त्यामुळे पूजा खेडकर यांची पिलावळं देशात यापुढे कोणत्याही स्तरावर निर्माण होणार नाहीत, वाढणार नाही, याची काळजी सगळ्यांना घ्यावी लागणार आहे.

## यंगिस्तान

# वोकिज्मने घेतला फेमिनिज्मचा बळी!

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

युनायटेड स्टेट्समध्ये एका पोलिस अधिकाऱ्याने मायकेल ब्राऊन नावाच्या १८ वर्षीय कृष्णवर्णीय तरुणाला गोळ्या घालून मारल्यानंतर 'स्टे वोक, वोक' हे शब्द चर्चेत आले. आपण सतत जागृत असलं पाहिजे. महिलांवर, कनिष्ठ वर्गावर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला पाहिजे, असा याचा अर्थ आहे. मात्र, ही 'वोक' संस्कृती जगाला पोखरत आहे. २०२३ च्या विजयादशमीच्या भाषणात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी मार्क्सवादी लोकांना 'वोक' म्हटले. ते म्हणाले की, सध्या त्यांचे नवीन नाव आहे, कल्चरल मार्क्सिज्म किंवा वोक. डॉ. भागवत यांनी केलेली टीका अतिशय योग्य आहे. कारण सुरुवातीला या डाव्या लोकांनी मजूर, शेतकरी आणि इतर शोषित वर्गाच्या मनात श्रीमंत आणि प्रस्थापित लोकांच्या विरोधात भडकवलं. यातून नक्षली चळवळ निर्माण झाली. यात अपयश आल्याने त्यांनी नवीन मुखवटा चढवला आहे. यालाच 'कल्चरल मार्क्सिज्म' किंवा 'वोकिज्म' म्हणतात.

सामाजिक न्याय, मुक्त संभोग, फेमिनिज्म (महिलांचे अधिकार) आणि ट्रान्सजेंडर इत्यादी गोष्टी समोर ठेवून वोकिज्म आपलं काम करत आहे. डाव्यांना आपली विद्यमान संस्कृती पूर्णपणे नष्ट करायची आहे. यात त्यांच्यासमोरचा सर्वात मोठा अडथळा म्हणजे हिंदू. कारण ख्रिस्ती, जिहादी, डाव्या आक्रमकांनी मिळून जगातल्या अनेक संस्कृती नष्ट केल्या आहेत. मात्र, हिंदू अजूनही ठामपणे उभा आहे. त्यामुळे जगात असलेली उजवी संस्कृती तर या डाव्यांना नष्ट करायचीच आहे; त्यांचे सर्वात मोठे 'टार्गेट' भारत आहे. आता हा वोकिज्म कसा काम करतो? हे लोक सर्वात आधी तुमच्या वांशिक मुळावर प्रहार करतात. आपल्याला सांस्कृतिक देण (जात, धर्म, विचार इ.) आपल्या कुटुंबाकडून मिळते. मग यातून मुक्त होण्यासाठी कुटुंब व्यवस्थाच नको. कौटुंबिक रचनेवर प्रहार केला जातो. तुम्ही तुमच्या मर्जीचे मालक झाले पाहिजे. तुम्हाला लग्न नसेल करायचं, मुलं जन्माला नसतील घालायची तर ही तुमची निवड आहे. लग्न म्हणजे परवानाकृत वेश्या-व्यवसाय असं नॅरेटिव्ह सेट केलं जातं. मुक्त संभोग म्हणजे 'फ्री सेक्स'ला पाठिंबा दिला जातो. या मुक्त संभोगात नातीगोती महत्त्वाच्या नसतात. त्याचबरोबर इथे लिंगभेदही करता कामा नये. तुमच्या जन्माच्या वेळी तुम्हाला लैंगिक ओळख मिळते. पण या



'वोकिज्म'मध्ये तुमचं जेंडर निवडण्याचं स्वातंत्र्य तुम्हाला असतं. तुम्ही पुरुष असाल आणि तुम्हाला जर वाटलं की तुम्ही स्त्री आहात, तर लोकांनी तुम्हाला स्त्रीच मानले पाहिजे, असा अट्टाहास असतो. भारतात याची प्रखरता अजूनही दिसून येत नसली, तरी अमेरिकेसारख्या देशात हे सर्रास घडतं. लेखक अभिजित जोग यांनी एका मुलाखतीत याविषयी विस्तृत माहिती दिलेली आहे. ते म्हणतात की, अमेरिकेत एखाद्या मुलाने आपण मुलगी आहोत असे घोषित केले तर तो मुलींच्या शौचालयात सहज प्रवेश मिळवू शकतो. परिस्थिती इतकी बिकट आहे की, कुणी कुत्र्याचा आवाज काढला आणि आपण कुत्रा आहोत असं म्हणाला, तर त्याच्या कुत्रा असण्यावर तुम्ही आक्षेप घेऊ शकत नाही. अशी अनेक उदाहरण आहेत. ज्यात मुलगी स्वतःशीच लग्न करते आणि स्वतःसोबतच मधुचंद्राला जाते. कुणी स्वतःशीच कसं लग्न करू शकतं? एखादी स्त्री बाहुल्याशी लग्न करते आणि त्यालाच आपला पती मानते. एखादं लहान बाहुलं बनवून त्यालाच आपलं बाळ मानते. हा काय प्रकार आहे? मी काही वर्षांपूर्वी डाव्यांच्या फिल्म फेस्टिव्हलला गेलो होतो. महाविद्यालयीन तरुणांसाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. तिथे एक महिला सामाजिक कार्यकर्ता होती. ती म्हणाली की, मी माझ्या मुलाला मुलींचे कपडे घालू देते, दागिने घालू देते. कारण त्याने महिलांचा सन्मान केला पाहिजे. आता मला सांगा, महिलांचा सन्मान करण्यासाठी तुम्हाला महिला असल्याचे सोंग घ्यावे लागत असेल तर तुम्ही खरं तर महिलांचा अपमान नाही का करत? उलट तुम्ही परिपूर्ण पुरुष असून महिलांचा सन्मान करता तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांचा सन्मान होतो. महिलांचा सन्मान करण्यासाठी बाप्याने बाईचे कपडे घालून फोटो सेशन करायची गरज नाही. या वोकिज्मचे गंभीर परिणाम भविष्यात भोगायला लागणार आहेत. याची झलक पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दिसून आली आहे. यावर्षीच्या ऑलिम्पिकची थीम आहे जेंडर इक्वालिटी. या ऑलिम्पिकमध्ये महिला स्पर्धकांचे प्रमाणही लक्षणीय आहे. ही खरंच अभिमानाची बाब आहे. पण जेंडर इक्वालिटीच्या अतिरिक्त अट्टाहासापोटी एका महिलेचा बळी गेला आहे.

इमाने खेलिफ आणि लिन यू तिंग हे दोन पुरुष यावर्षी महिला म्हणून ऑलिम्पिक स्पर्धेत उतरले आहेत. २०२३ मध्ये लिन यू तिंग सेक्स टेस्टमध्ये नापास झाला म्हणून वुमन्स वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपचं त्याचं कांस्य पदक इंटरनॅशनल बॉक्सिंग असोसिएशनने त्याच्याकडून काढून घेतलं होतं. आता त्याला आश्चर्यकारकरीत्या ऑलिम्पिकमध्ये खेळण्याची संधी मिळाली आहे. हीच कहाणी इमाने खेलिफची आहे. अधिक टेस्टोस्टेरॉन लेव्हल असल्यामुळे त्याच्यावर भारतात झालेल्या बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये बंदी घालण्यात आली होती. त्याच्यामध्ये 'एक्स-वाय क्रोमोसॉम' आढळलं, जे पुरुषामध्ये आढळून येतं. पूर्वी अनेक चाचण्या घेतल्या जायच्या आणि त्यानंतरच स्पर्धकांना प्रवेश मिळायचा. आता १९९९ च्या सगळ्या चाचण्या बंद केल्या आहेत आणि या वर्षीची थीम जेंडर इक्वालिटी असल्यामुळे या दोघांना या स्पर्धेत प्रवेश मिळाला. याचे गंभीर परिणाम आता समोर आले आहेत. इमाने खेलिफने अॅन्जेला नॅरिनीचा पराभव केला. खेलिफच्या बुक्क्यांनी अॅन्जेला रक्तबंबाळ झाली आणि तिच्या डोळ्यांतून अश्रू आले. ४६ सेकंदाच्या आतच तिने आपला पराभव स्वीकारला. ती म्हणाली की, मला जिवंत राहायचे होते. जे झालं ते वाईट झालं. वोकिज्ममुळे अॅन्जेलाचा बळी गेला. विजेता होण्याचं तिचं स्वप्न रसातळाला गेलं. या वोकिज्मचे आणखी अनेक बळी जाणार आहेत. 'फेमिनिज्म' हा वोकिज्मचा उपप्रकार आहे. आता वोकिज्मनेच फेमिनिज्मचा बळी घेतला. डावी विचारसरणी जगात वैचारिक युद्ध करून तिथली संस्कृती नष्ट करण्यासाठी पूर्ण प्रयत्न करत आहे. आता यावर एकच उपाय, सज्जनांचे संघटन!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

अभिजित लिखिते

# हानिया, शुकर, देफच्या खात्म्याने होणार उलथापालथ

इस्रायलने हमासचा प्रमुख हानिया, हिजबुल्लाचा उपप्रमुख शुकरचा खात्मा केल्यानंतर लगेच देफलाही संपवले. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलवर झालेल्या नृशंस हल्ल्यानंतर हा देश प्रचंड संहार करणार असल्याचे निश्चित झाले होते. इस्रायलचा पूर्व इतिहास पाहता, हे होणारच होते. इस्रायल शत्रूला लोळवण्यासाठी पाताळापर्यंत त्याचा माग काढू शकतो. पण, त्यानंतर सुरू झालेल्या हमास व इस्रायलमधील गाझापट्टीतील युद्धामुळे जगभरात तणाव वाढला. रशिया व युक्रेनमधील युद्धाचा चटका अगोदरच लागला असताना गाझापट्टीत युद्धाची आग भडकली. आता इस्रायलने लेबनॉन आणि इराणमध्ये कारवाई करीत देशाच्या शत्रूंना यमसदनी धाडले. त्यामुळे या युद्धाची व्याप्ती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्याने सूड घेण्यासाठी इस्रायलवर हल्ला करण्याचा आदेश दिला. त्यामुळे इराण आणि लेबनॉनही यात उतरणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यात तुर्कीची भूमिकाही महत्त्वाची ठरणार आहे. व्याप्ती वाढलेल्या या युद्धाचा भीषण परिणाम जगावर विशेषतः आशियावर होणार आहे.

गाझामधील पेटलेल्या युद्धामुळे अगोदरच गुंतवणूकदार चिंतेत आहेत. या घटनेचा आशियातील बाजारांवर होणाऱ्या परिणामांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आशियातील देश सुरू करतील. जागतिक घडामोडी विशेषतः कोणताही भू-राजकीय तणाव आर्थिक बाजारपेठेत उलथापालथ करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतो. यामुळे गाझातील युद्धाने गुंतवणूकदारांना निश्चितपणे जागतिक परस्परावलंबनांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यांची आठवण करून दिली आहे. अशा तणावांचे तत्काळ व दीर्घकालीन परिणाम होत असतात. जागतिक तेल पुरवठ्यात मध्यपूर्वेचा वाटा मोठा आहे. युद्धाची व्याप्ती वाढली, तर याचा सर्वांत भीषण परिणाम भारतावर होईल तसेच आशियातील इतर देशांवरही तो होणार आहे. तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्यास तेलाच्या किमती वाढतील. त्यामुळे जागतिक चलनवाढीचा दर



आणि व्यापारातील संतुलन प्रभावित होईल. हे संतुलन तसेही युद्ध सुरू झाल्यानंतर बिघडले आहे. भूराजकीय तणावाच्या काळात गुंतवणूकदार सोने, जपानी चलन आणि इतर सुरक्षित गुंतवणुकींकडे वळतात. सध्याचा तणाव वाढल्यास नवीन सुरक्षित गुंतवणुकीचा शोध गुंतवणूकदारांकडून घेतला जाईल, हे निश्चित आहे. त्याचा परिणाम जगातील शेअर बाजारांवरही निश्चितपणे होणार आहे. हा परिणाम युद्ध करणाऱ्या देशांशी जवळचे संबंध असलेल्या किंवा तेल आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशांमधील शेअर बाजारावर मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. तिथे अस्थिरता येते. मात्र, अलिकडील काळात भारतीय शेअर बाजाराने लवचीकता दाखवली आहे. संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे. त्याचा गंभीर परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे. यामुळे उच्च आयातीत चलनवाढ होऊ शकते. उद्योगांच्या उत्पादन खर्चावर याचा परिणाम होऊ शकतो. इराणने युद्धात उडी घेतल्यास होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येणाऱ्या मालवाहू जहाजांचा मार्ग धोक्यात येण्याची शक्यता आहे. इराणने याआधीही अशी धमकी दिली होती. असे झाल्यास आशियातील देश मोठ्या प्रमाणात पोळून निघतील. इराणने उडी घेतल्यास सागरी मार्गांवर निश्चितपणे परिणाम होईल. त्यामुळे मालवाहतूक व विमा खर्च वाढण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाचा पुरवठा बाधित झाल्यास प्रमुख आयातदार असलेले अमेरिका, भारत, चीनमधील उच्च आयातीत निश्चितपणे चलनवाढ होऊ शकते.

या युद्धाचे भूराजकीय परिणामही निश्चित आहेत. यामुळे मध्यपूर्वेची स्थिती कठीण असेल. अलिकडच्या घडामोडी पाहिल्या असता अमेरिकेचा प्रभाव कमी होत असल्याचे दिसत आहे. अमेरिकेत एकीकडे राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होत असताना, दुसरीकडे या देशाला इस्रायलचा विषयही कठीण होत असल्याचे दिसत आहे. या मुद्यावर अमेरिका नेमकी कोणती भूमिका घेईल याची उत्सुकता आहे. अमेरिकेचा प्रभाव कमी होण्यामागे अमेरिकेतील झालेला ९/११ हल्ला २०१०-११ दरम्यान अरब स्प्रिंग उठावदेखील कारणीभूत ठरले आहेत. त्यानंतर अमेरिकेने या भागातील लष्करी बांधिलकी कमी केली. सध्या अमेरिकेचे परराष्ट्र धोरण चीनला रोखण्यासाठी भारत-प्रशांतकडे वळले आहे. या युद्धाचा फायदा घेत चीन स्वतःचे सामर्थ्य वाढवण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

९०२८०५५१४१

## मुंबई वार्तापत्र

# 'मेरी हिम्मत को परखने की गुस्ताखी मत करना...'

नागेश दाचेवार

उद्धव ठाकरेंच्या राजकारणातील सुरुवातीच्या काळात तळागाळातले शिवसेनेचे कार्यकर्ते स्वतःच म्हणायचे, उद्धव साहेब साधासुधा, सोज्वळ माणूस आहे. राजसाहेबांसारखा 'रफ ॲण्ड टफ' नाही. हा शिवसेनेच्या पठडीत बसणारा नाही. मुळात हा शिवसेनेसाठी बनलाच नाही वगैरे वगैरे... यावेळी अचानक उद्धव ठाकरे यांची तू-ता ची टपोरी भाषा ऐकली आणि साधासुधा, सोज्वळ माणूस समजणाऱ्या कार्यकर्त्यांचा गैरसमज दूर झाला. उद्धव मुळात पहिलेपासून आतल्या गाठीचाच माणूस, कोल्ड ब्लडेड मर्डरसारखी खुनशी वृत्ती तर त्याने आधीच आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात दाखविलीच आहे. याचा अनुभव तर घरच्यांना, सख्ख्या भावाला, चुलत भावाला कधीचाच आलाय्... डाव धरून ठेवणे, मग काटा काढणे वगैरे सर्व प्रकार करून मोकळा झालेल्या ठाकरेंबद्दल तरीही कार्यकर्ते आजही संभ्रमातच होते. लोकांना, कार्यकर्त्यांना सतत वाटायचं संजय राऊत काय भाषा बोलतो! महिलांविषयी अपशब्द वापरतो, महिलांचा अपमान करतो, वृत्तवाहिन्यांच्या कॅमेऱ्यांसमोर अश्लील भाष्य करतो आणि आमचे उद्धवसाहेब हे कसे सहन करून घेतात? राऊताला का आवरत नाहीत? भाषेवर अंकुश का लावत नाहीत? या सगळ्याचं उत्तर आज कार्यकर्ते आणि अवघ्या महाराष्ट्राला मिळालं असेल. आता मालक जी कृती करेल, ज्या भाषेचा वापर करेल त्याचंच अनुकरण खालचे कार्यकर्ते करतीलच नाही का...

राज्याच्या मुख्यमंत्र्यांसारख्या संवैधानिकपदावर राहिलेला माणूस आपल्या लायकीचे प्रदर्शन मुख्यमंत्रिपदावर असतानापासून तर आजवर सातत्याने करत आला आहे. बरं यांची, यांच्या पक्षाची आणि यांनी पोसून ठेवलेल्या कार्यकर्ता नावाच्या टोळीची संस्कृती, भाषा ही नेहमी टपोरीबाजच, गुंडगिरीची, भाईगिरीचीच राहिली आहे. बरं, ही सगळी तोंडावाटे बाहेर येणारी आगपाखड कशासाठी आहे, ही उद्विग्नता कशाची आहे? कारण फडणवीसांनी यांचे वसुलीचे धंदे बंद केले, मातोश्रीवर जाणारे खोके बंद केले. हे अवघ्या महाराष्ट्राला सर्वश्रुत आहे.

''तू राहशील, नाही तर मी !'' असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी केले फडणवीसांना लक्ष्य. शरद पवार फडणवीसांना लक्ष्य करतात. मराठा आंदोलक



जरांगे फडणवीसांना लक्ष्य करतात. काँग्रेसदेखील फडणवीसांवर तोंडसुख घेत असते. याचा सरळसरळ अर्थ असा की, फडणवीसांच्या नावानं या सगळ्यांची टरकते. फडणवीसांची रणनीती, फडणवीसांची व्यूहरचना, निवडणूक तंत्र ज्याने दोन दोन वेळा राज्यसभा आणि विधानपरिषदेच्या निवडणुकांमध्ये यांना अस्मान दाखवले, सत्तेतून पायउतार करून आपल्या निवडणूक कौशल्याचे अनिल देशमुख, नवाब मलिकांना जागा दाखवली. सत्तेत नसताना, हातात यंत्रणा नसताना फडणवीसांनी यांची पळता भुई थोडी केली. यांच्या पक्षाची, यांची दाणादाण उडविली. त्यामुळे यांना केवळ फडणवीस खुपतात. आता काय नवं सोंगं समोर आणलं, अनिल देशमुखांना शपथपत्र लिहून देण्यास फडणवीसांनी सांगितलं म्हणे. मूर्खांचा बाजार भरलाय् मविआमध्ये. जेव्हा मागितलं तेव्हा ते शपथपत्र ठेवून घ्यायचे होते, उघड करायचे होते, फडणवीसांचं षडयंत्र उघडं पाडायचं होतं. यातलं देशमुखांनी काहीएक केलं नाही आणि आता छाती बडवताना दिसत आहेत. महत्त्वाचं म्हणजे, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंना तुरुंगात डांबण्याचा डाव फडणवीसांनी रचला होता. होय रचला होता, पण नेमकं कोणत्या प्रकरणात जरा सविस्तरपणे जनतेला सांगा ना. काय म्हणून शपथपत्र करून मागत होते फडणवीस? याबाबत काही सांगताना देशमुख दिसत नाहीत. ठाकरेदेखील सांगत नाहीत. आदित्यचं एकदा आपणच समजून घेऊन दिशा सलियान प्रकरण अंगलट आलं आहे त्याच्या. पण उद्धव ठाकरेंविरोधात कोणत्या प्रकरणात अडकविण्यासाठी देशमुखांवर दबाव आणला जात होता? याचा खुलासा केला पाहिजे ना की निव्वळ खोटं नॅरेटिव्ह पसरवायचा प्रयत्न तर नाही ना. आजवर झोपलेले होते; आज अचानक जाग आल्याने प्रश्न पडतो.

मुळात तू राहशील, नाही तर मी, असे नाही, पण तू नाही राहशील, असं आव्हान काही लोकांनी यापूर्वी फडणवीसांना दिलं होतं. अनेक षडयंत्र करण्यात आले. फोन टॅपिंग प्रकरणात अडकविण्याचा डाव जो रचला गेला होता, एक छायाचित्र दाखवून ड्रग्स माफियासोबत संबंध असल्याचा प्रयत्न झाला; एवढंच नव्हे फडणवीस फसत नाहीत म्हणून, एका डिझायनर उच्चशिक्षित मुलीद्वारे त्यांच्या पत्नीला लाच देऊन फसविण्याचा प्रयत्न केला गेला. पण यांच्या कुठल्याही चक्रव्यूहात फडणवीस अडकले नाहीत किंवा षडयंत्राला बळी पडले नाहीत. हे त्यांचे कौशल्य आहे. मुलाबाळापर्यंत, घरापर्यंत येण्याची महाराष्ट्राची संस्कृती नव्हती. फडणवीसांमुळे वातावरण खराब झाल्याची टिमकी वाजविली जात आहे. नवाब मलिकांनी फडणवीसांच्या पत्नीचा फोटो भर पत्रकार परिषदेत दाखवून ड्रग्स माफियांसोबत संबंध असल्याचे सांगणे, डिझायनर उच्चशिक्षित मुलीद्वारे फसवणुकीच्या प्रकारावर मविआ नेत्यांनी उचकटलेल्या तोंडांना घरापर्यंत पोहोचणे नाही तर काय म्हणावे? आणि हे लोकं आज महाराष्ट्राच्या संस्कृती, घरादाराच्या टिमक्या वाजत आहेत, याचे आश्चर्य वाटते.

मुळात आव्हानं देणाऱ्यांनी आपली लायकी ओळखून आव्हानं द्यावीत. मुख्यमंत्रिपदावरून हकालपट्टी केल्यानंतर बापलेकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना कित्येक वेळा आव्हान दिले, राजीनामा द्या निवडणुकीला समोर जा, मी ठाण्यात येऊन लढतो नाहीतर तुम्ही वरळीतून लढा वगैरे वगैरे... लोकसभेची निवडणूक लागली आणि शिंदेंच्या पुत्राच्या विरोधात निवडणूक लढायला कोणी सापडत नव्हते तर नवख्या महिलेला बळीचा बकरा बनवले. जेव्हा खरोखर आव्हान पेलण्याची वेळ आली तेव्हा मैदान सोडून पळून जाणारे कोणत्या तोंडाने पुन्हा आव्हान देत असावेत, हे निर्लज्ज लोकं. आपली लायकी आणि पायरी सांभाळून बोललं पाहिजे, नाहीतर नादी लागणाऱ्यांना फडणवीसांनी ''मेरी हिम्मत को परखने की गुस्ताखी मत करना, पहले ही कई फसानो का रुख मोड़ चुका हूँ मैं..'' असा शायरीतून इशारा दिलाच आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### आंदोलनजीवी

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधी पक्षात खडाजंगी सुरू आहे. विरोधी पक्ष नेता पहिल्या दिवसापासून प्रतिपंतप्रधान असण्याच्या आवेशात बोलताना सभापतीला अभय (?) देतो आणि शेतकरी आंदोलन करणाऱ्या नेत्यांना संसदेत निमंत्रित करून सभागृहाचे औचित्य भंग करतो. हिंदूंचा भर सभेत अपमान करून महाभारताचा अभ्यासक असल्याप्रमाणे चक्रव्यूह, अभिमन्यू, कमळ यावर काथ्याकूट करणे हे खासदार अनुराग ठाकूर (आयएएस) यांना सहन होत नाही आणि त्यावर खरे वास्तव सांगणे हा विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांचा अपमान कसा काय झाला? कारण जातीय सर्वेक्षण करण्याचा विडा तर राहुल गांधी यांनीच उचललेला आहे! आजच्या वर्तमानपत्रात आंदोलनजीवींचे 'जोडे मारो' आंदोलन प्रसिद्धीस दिलेले आहे. परंतु ज्या खासदाराने भारतीय संसदेत दुसऱ्या देशाचा जयजयकार केला त्यावर यांनी ब्र काढू नये, हीच काय यांची देशभक्ती? यापुढील आंदोलने गृहयुद्धे ठरू नयेत याची काळजी आतापासूनच गृहमंत्रालय आणि प्रसिद्धी माध्यमांना घ्यावी लागेल. कारण ऊठसूट होणाऱ्या आंदोलनाला पोलिस विभागाची परवानगी आवश्यक असते.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

●● ●●

### सद्गुणांची वाढ आणि दुर्गुणांचे निवारण

आपल्याला मनुष्य जन्म प्राप्त झाला आहे त्याचा उद्देशच आपल्यात आदर्श व्यक्तिमत्त्व निर्माण करणे आणि त्याची जोपासना करणे आहे. आपल्यातील सद्गुण वाढीबरोबरच जे काही आपल्यात दुर्गुण असतील ते ओळखून त्यांना दूर करणे महत्त्वाचे असते. ज्याप्रमाणे शेतीच्या उत्तम मशागतीकरिता पिकांच्या आजूबाजूला वाढणारे तण, गवत काढून त्यांचा वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक असते; अन्यथा पिकांकरिता टाकलेले खतपाणी त्यांनाच मिळून त्याचा पिकाच्या उत्पादनावर परिणाम होतो. त्याचप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी आपल्या दुर्गुणांचा समूळ उच्छेद करून आपल्यातील सद्गुणांची वाढ करणे आवश्यक असते. सद्गुणांबरोबर आपल्यात अनेक दुर्गुण असतात की जे आपल्या अंतर्मनात ठाम घर करून बसलेले असतात आणि त्याची आपल्याला जाणीवसुद्धा नसते किंवा एखाद्याने त्याची जाणीव करून दिली तरी ती त्वरित मान्य होत नाही. मत्सर, द्वेष आणि असूया हे दोष बहुतेक सर्वांमध्ये कमी-जास्त प्रमाणात आढळतात. त्यामुळेच न्यूनगंडाची भावना निर्माण होऊ शकते. एखाद्याकडे एखादी वस्तू आहे आणि आपल्याकडे नाही, त्याबद्दलची वाटणारी खंत याच्यातूनच तीव्रतेने मनात नकारात्मक भावना वाढून इतर गंभीर दोषांचे बीजारोपण व्हायला सुरुवात होते. त्यामुळे आपण न्यूनगंडात जाऊन आपले आयुष्य दुःखदायक होऊ शकते. त्या दुर्गुणांना/दोषांना वेळीच नियंत्रणात ठेवून त्यावर सकारात्मक दृष्टिकोनातून उपाययोजना केली तर आपले संपूर्ण जीवन सुखमय होऊ शकते. अमूक गोष्ट आपल्याकडे नाही याबद्दल अनावश्यक विचार करून स्वतःला क्लेश करून घेण्यापेक्षा, जे नाही त्यामागे काहीतरी ईश्वरी संकेत आहे आणि जे काही आपल्या जीवनात घडतं ते आपल्या कल्याणाकरिताच आहे, असा आध्यात्मिक दृष्टिकोन ठेवून, मनाला तशा स्वयंसूचना दिल्या तर खऱ्या अर्थाने आपले जीवन आनंदमय होईल आणि सर्व दुर्गुणांचे निवारण विनासायास होण्यास सहाय्य होईल.

**श्रीकांत रामचंद्र पाध्ये**/८२७५८६५२८५

●● ●●

### पिण्याचे पाणी कोठून आणायचे?

मागील चार दिवसांपासून गोंदिया येथे नळाचा पाणी पुरवठा बंद आहे. जीवन प्राधिकरण विभाग रोज नुसती एक नोटीस टाकतो की, उद्या सकाळी ६ ते संध्याकाळी ६ पर्यंत पाणी पुरवठा होणार नाही. एवढे करून त्यांचे कर्तव्य ते इमानेइतबारे पार पाडत आहेत. पण नागरिकांना काय त्रास होतो आहे, याची कल्पना या विभागाला आहे का? वापरायला पाणी लोकांजवळ आहे, पण प्यायचे पाणी कोठून आणायचे? बरे; आमचे लोकप्रतिनिधी इतके ढिम्म आहेत की, त्यांना या समस्येशी काही सोयरसुतक नाही. तसेही त्यांना प्यायला 'बिसलेरी' आधार आहे. मरण बिचारे मध्यमवर्गीयांचे होते. आता प्यायचे पाणी नळाला कधी येते, याची वाट पाहण्याव्यतिरिक्त दुसरा मार्गच दिसत नाही.

**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

●● ●●

### राजकारणच का?

कुठलेही वर्तमानपत्र घ्या की चॅनेल बघा; फक्त राजकीय बातम्याच दिसतात. अर्थात याला सन्माननीय अपवाद वेगळा. अतिरेक इतका असतो की, त्यात दुसऱ्या क्षेत्रांना वावच नसतो. अर्थात याला पण अपवाद वेगळा. साहित्यिक-सांस्कृतिक-कलाविषयक क्षेत्रांना कधी झुकते माप मिळताना दिसत नाही. अर्थात याला पण अपवाद वेगळा. राजकारणाशिवाय जणू दुसरे विषय नाहीत, अशा पद्धतीने राजकीय दळण दळले जात असते. खरं म्हणजे समाजातील सारी क्षेत्रे एकमेकांना पूरक असतात. त्यामुळे माध्यमातून त्याचा ऊहापोह व्हायला हवा. तसा तो थोडाबहुत होतो. पण तितके पुरेसे नाही ना. संबंधित आत्मपरीक्षण करतील का?

**आशिष देव**/चंद्रपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

# सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चार दिवसात गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक

**गुन्ह्यात गेलेला सर्व मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.३ ऑगस्ट**

पोलीस स्टेशन धारूर येथे फिर्यादी नामे बाबासाहेब गिण्यानदेव नाईकवाडे वय ५० वर्षे राहणार घागरवाडा तालुका धारूर हे पैसे काढण्यासाठी एसबीआय बँक शाखा धारूर येथील एटीएम मशीनवर मध्ये गेले असता अज्ञात आरोपीने एटीएम मधून पैसे काढून देतो असे म्हणून फिर्यादीचा विश्वास संपादन करून एटीएम कार्ड ची अदलाबदल करून ६१,०००/- रुपये परस्पर काढून फसवणूक केल्यामुळे अज्ञात आरोपी विरुद्ध पोस्ट धारूर येथे गुन्हा क्रमांक २०८/२०२४ कलम ३१६ (२), ३१८ (४) भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे तपासात गुन्ह्याचे घटना ठिकाणी एसबीआय बँक शाखा धारूर येथील सीसीटीव्ही फुटेज मिळून आल्याने केवळ सीसीटीव्ही फुटेज आधारे आरोपीचा शोध धारूर आडस अंबाजोगाई मुडेगाव येथे जाऊन घेतला आसता आरोपी नामे विकास सतीश करंजकर वय २७ वर्ष राहणार




मुडेगाव तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड हा निष्पन्न झाला. सदर आरोपी शोधार्थ पथक रवाना करण्यात आले. तो आज रोजी अंबाजोगाई येथे मिळून आल्याने आल्याने त्यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणून तपास करण्यात आला. त्याने गुन्हा कबूल केला असून त्याने गुन्ह्यात एटीएम कार्ड चा वापर करून काढलेले ६१,०००/- रुपये व गुन्ह्यामध्ये वापरलेली मोटर सायकल जप्त करण्यात आलेली आहे. केवळ सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे चार दिवसात गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक करून गुन्ह्यात गेलेला सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस धारूर कोर्टात हजर केले असता माननीय कोर्टाने आरोपीची दोन दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केलेली आहे. आरोपीने आणखी काही ठिकाणी केलेले गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून त्याबाबत तपास चालू आहे. सदर कामगिरी माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री नंदकुमार ठाकूर सर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. कमलेश मीना साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. देविदास वाघमोडे, पोलीस उपनिरीक्षक गोविंद बास्टे पोलीस हवालदार रमाकांत भुसारी, चांदणे, पोलीस अंमलदार नाना निंगुळे यांनी केली आहे.

# अण्णाभाउ साठे यांच्या विचाराची जयंती झाली पाहिजे–डॉ.मिलींद आवाड

**मानवी हक्क अभियानची अभिवादन सभा दुचाकी रॅलीने वेधले लक्ष**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ ऑगस्ट**

साहित्यसम्राट अण्णाभाउ साठे यांनी दलित, वंचित यांचे प्रश्न, गिरणी कामगारांचे प्रश्न आपल्या लेखणीतून मांडण्याचे काम केले. त्यामुळे त्यांच्या विचाराची जयंती झाली पाहिजे असे आवाहन मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलींद आवाड यांनी केले.



मानवी हक्क अभियानच्या वतीने दि. १ ऑगस्ट रोजी वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थांनी मा. आ. डी. के. देशमुख, आमदार प्रकाश सोळंके, भाजपा नेते मोहन जगताप, दयानंद स्वामी,नारायण डक, रामा राठोड, दत्ता डाके, धम्मानंद साळवे, नारायण गोले, जीवन राठोड, अभय होके, रंजित कांबळे, कचरू खळगे, शेख मंजुर, शरद यादव, सहाल चाउस, अरूण इंगळे, तुकाराम येवले, सभापती जयदत्त नरवडे, नितीन नाईकनवरे, सुरेश साबळे, डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले जयसिंग सोळंके, नानासाहेब घोडके, उमेश मोगरेकर, नानाभाउ शिंदे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. मिलींद आवाड म्हणाले की, जो माणुस गुलाम आहे, जो माणुस लाचार आहे, शोषित आहे, त्या माणसाला त्याच्या हक्काची जोपर्यंत जाणिव होत नाही तोपर्यंत तो पेटून उठणार नाही. आजच्या युवा पिढीने अण्णाभाउंचा आदर्शवाद आपल्या जिवनात अंगिकारावा असेही ते म्हणाले. दुचाकी रॅलीचे देखिल आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात अण्णाभाउ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून दुचाकी रॅली सभास्थळी गेली. रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात युवकांचा सहभाग होता. अभिवादन सभेस मोठ्या प्रमाणात समाजबांधव उपस्थित होते. सुत्रसंचालन बाबासाहेब थोरात, सुमंत गायकवाड यांनी तर आभार संदिप वाघमारे यांनी मानले.

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ ऑगस्ट**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, गोकुळ शिशुवाटिका येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सर्वप्रथम अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला गोकुळ शिशुवाटिका प्रमुख सौ स्नेहलताई देशपांडे व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गायत्री गमे व अध्यक्ष संग्राम देशमुख यांनी पुष्प अर्पण करून दीपप्रज्वलन केले. व सौ स्वातीताई देशपांडे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या बद्दल मुलांना माहिती दिली व सौ क्रांती ताई पोरवाल यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची माहिती दिली. त्यानंतर ध्रुव गटातील अद्विका मुंडे , आर्यन पौळ यांनी भाषणे केली. व संग्राम देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन विश्वजीत गुजर यांनी केले या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# कपडे बदलल्यासारखे नेते आणि पक्ष बदलणाऱ्यांनी एकनिष्ठांना शिकवू नये– खुर्शिद आलम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ ऑगस्ट**

तीन लाख बीड शहर वासियांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर अखेर जिल्हा वार्षिक योजनेतून म्हणजेच डीपीसी मधून आठ कोटी रुपये मंजूर केले जाणार असल्याची माहिती मिळाली अन हसूच आवरेना झाले. पालकमंत्री महोदय, बीडचे आ संदीप क्षीरसागर आणि माजी आ सय्यद सलीम वर्षभरापासून हेच तर सांगत अन मागत आहेत. तुम्ही श्रेयासाठी दोन वर्ष बीडच्या नागरिकांना वेठीस धरले अन न्यायालयात जायला भाग पाडले.

बीड शहराला पाणी पुरवठा करन्यासाठी तयार केलेल्या अटल अमृत योजनेत वीज जोडणीसाठी महावितरण विभागाने ३८ कोटींची थकबाकी भरण्याची अट नगर पालिकेला घातली. मात्र हे पैसे उपलब्ध नसल्याने डीपीसी मधून याची तरतूद करावी किंवा सरकारने विशेष बाब म्हणून हा निधी द्यावा यासाठी तीन अधिवेशनात आ संदीप क्षीरसागर यांनी हा प्रश्न मांडला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केलेली योजना केवळ वीज जोडणीमुळे सुरु होऊ शकलेली नाही हे देखील सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. धनूभावू आपण मंत्री आहात हे रेकॉर्ड आपल्याला सहज उपलब्ध होईल, एकदा सभागृहाचे रेकॉर्ड काढून बघा.बर ते जाऊ द्या, जिल्हा वार्षिक योजनेतून म्हणजेच डीपीसी मधून पैसे द्यावेत ही मागणी आ क्षीरसागर यांनी जानेवारी २०२४ च्या बैठकीत केली होती. तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या दालनात देखील बैठक घेऊन समजावून सांगितले होते. पण आपण दुर्लक्ष केले. याचेही रेकॉर्ड उपलब्ध आहे, एकदा चेक करा.

# जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट गैरव्यवहार प्रकरणात एमपीआयडी १९९९ प्रस्तावास लवकरच मान्यता मिळणार–राजेंद्र मस्के

**मुख्य आरोपी अटकेसाठी ठेवीदारांच्या शिष्ट मंडळासह ना. फडणवीसांची भेट घेणार**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ ऑगस्ट**

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव रकमेच्या गैरव्यवहार गुन्ह्यातील ठेवीदारांची वित्तीय संस्थामधील हित संबंधांचे संरक्षण अधिनियम एमआयडी १९९९ अंतर्गत जिल्हा प्रशासनामार्फत प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. १५ जुलै दरम्यान राज्याचे उप मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस साहेब यांची भेट घेऊन सदरील प्रस्तावास तातडीने मान्यता देऊन अधिसूचनेत प्रसिद्धी द्यावी अशी मागणी ठेवीदारांच्या वतीने केली असून, हा प्रस्ताव मान्यता देण्यासाठी मंत्रालय स्तरावर गृह विभागात तातडीची कार्यवाही चालू आहे. लवकरच या प्रस्तावास राज्य सरकार मान्यता देणार आहे. आवश्यकता वाटल्यास जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदार शिष्ट मंडळाची ना. देवेंद्र फडणवीस यांची भेट घालून देणार अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट बीड बँकेचे अध्यक्षा अनिता बबन शिंदे पती बबन विश्वनाथ शिंदे,अध्यक्षांचे कुटुंबीय, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने ठेवीदारांच्या सुमारे २०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. या विरोधात पो. स्टे. शिवाजीनगर गु.र.न. ३६०/ २०२३ कलम ४२०,४०६,४०९,३४,१२० (ब) भा.द.वि, सह कलम




३,४ एम आय डी १९९९ प्रमाणे असे तीन गुन्हे बीड पोलिसात व एक गुन्हा धाराशिव जिल्ह्यात दाखल आहे.

गुन्ह्यातील आरोपींची स्थावर/ जंगम मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या ( वित्तीय आस्थापने मधील) हित संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत तपशीलवार प्रस्ताव मा. अप्पर पोलीस महासंचालक ( आ. गु. शा.) महाराष्ट्र राज्य मुंबुई यांच्याकडून मा. प्रधान सचिव विशेष गृह विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर आहे. सदरील प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट गुन्ह्यातील आरोपी व संबंधातील व्यक्तींची मालमत्ता शोधून जप्तीची कारवाई करणे करिता महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी तत्सम वरिष्ठ अधिकारी नेमून ठेवीदारांची रक्कम परत करणे करिता सरकारकडून प्रयत्न केले जातील.

मुख्य आरोपी बबन शिंदे याला अटक करावी व एम आयडी १९९९ अंतर्गत गुन्ह्यातील आरोपींची मालमत्ता जप्त करावी. अशी मागणी घेऊन ठेवीदार रस्त्यावर उतरले होते.भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी ठेवीदारांच्या मागणीची दखल घेऊन, राज्याचे गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीसाठी दाद मागितली आहे. राजेंद्र मस्के यांच्या प्रयत्नाचे ठेवीदार संघर्ष कृती समितीची मार्गदर्शक अशोक हिंगे, अध्यक्ष ॲड. अप्पासाहेब जगताप, कार्यध्यक्ष डॉ. अरविंद काकडे, मारुती तिपाले, शेख कुतुब भाई, चंद्रकलाताई बांगर, भाऊसाहेब परसे, इंजी सखाराम कळासे, डॉ. उमरजकर, रवींद्र पालीमकर, अच्युत वाघ, आर एस गायकवाड, सूर्यभान नवले, लक्ष्मण हाटवटे, प्रवीण पोपळे, भास्करराव मिसाळ, शहादेव नागरगोजे, सुभाष शिराळे, महेश साळप्पा आदि ठेवीदार बांधवानी आभार व्यक्त केले.

# केज उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ ऑगस्ट**

केज येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा

करण्यात आला. गुरुवार रोजी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. स्तनदा मातांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ केंद्रे यांनी स्तनपान या विषयावर मार्गदर्शन केले. आहार तज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आई व बाळासाठी स्तनपानाचे महत्त्व सांगितले. स्तनदा मातेच्या आहाराविषयी मार्गदर्शन केले. समुपदेशक सीता गिरी यांनी स्तनपानाच्या वेगवेगळ्या पद्धती विषयी मार्गदर्शन केले व श्रीमती जगताप यांनी स्तनपानाविषयी मार्गदर्शन केले. चित्रफित,चार्टच्या माध्यमातून मातांना मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमास स्तनदा मातांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# परळी ते कपिलधार बस सेवा पूर्ववत करावी



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ ऑगस्ट**

श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ येथून कपिलधार येथील बससेवा पूर्ववत करावी या मागणीसाठी आज एस टी महामंडळाचे परळी आगार प्रमुख यांना निवेदन देण्यात आले.

या बाबतीत अधिक माहिती अशी की, श्रावण महिन्याची सुरुवात सोमवार ४ ऑगस्ट पासून होत आहे. श्रावणमासा निमित्ताने परळी येथून श्रीक्षेत्र मन्मथस्वामी कपिलधार येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्याच बरोबर एक निसर्गरम्य ठिकाण व पावसाळ्यात सुरू होणारा प्रसिद्ध धबधबा पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात कपिलधार येथे जात असतात. मागील श्रावण महिन्यात परळी येथून कपिलधार ला जाणारी बस भाविकांच्या आग्रहास्तव सुरू करण्यात आली होती. या बसला उत्तम प्रतिसाद भाविकांकडून मिळाला होता. परंतु ही बससेवा खंडित केल्याने भाविकात नाराजी निर्माण झाली होती. याची दखल घेत महाराष्ट्र वीरशेव सभेचे तालुका अध्यक्ष महादेव इटके, मुद्रा लोन समिती बीड जिल्हा सदस्य सुशील हरंगुळे, परळी शिवसेना उपशहर प्रमुख सचिन स्वामी, प्रसिद्ध व्यापारी नागेश खानापुरे, शिवकुमार चौंडे, अमोल बुरकुल, पवन तोडकरी यांच्या शिष्टमंडळाने गुरुवार १ ऑगस्ट रोजी परळी आगार प्रमुख सिद्धार्थ सोनवणे यांना परळी ते कपिलधार बससेवा पूर्ववत करावी यासाठी निवेदन दिले. आगार प्रमुखांनी ही बससेवा पूर्ववत करण्याचे आश्वासन शिष्टमंडळास दिले आहे.

# नेत्रदिपक दिंडी सोहळ्याने संत सावता महाराजांचा समाधी सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ ऑगस्ट**

संतश्रेष्ठ सावता महाराजांच्या समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात मागील सात दिवसापासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरु असुन शनिवार दि.३ ऑगस्ट रोजी समाधी सोहळ्यानिमीत्त संत सावता महाराजांच्या पालखी सोहळ्याने परळी नगरीची नगर प्रदक्षिणा केली.संतांचे अभंग,भगव्या पताका घेतलेले भाविक,डोक्यावर मंगलकलश घेतलेल्या हजारो महिला भाविकांचा सहभाग असलेला चार तासांच्या नगर प्रदक्षिणेनंतर पाच वाजता सावतामाळी मंदिरात पोंहचल्यानंतर महाप्रसादाने सांगता झाली.

संतश्रेष्ठ सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी परळी येथील संत सावतामाळी मंदिरात रविवार दि.२८ जुलै पासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे.या सप्ताहाची रविवार दि.४ ऑगस्ट रोजी सांगता होणार आहे.सप्ताहात धार्मिक कार्यक्रमांबरोबरच सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.शनिवार दि.३ ऑगस्ट रोजी संत सावता महाराज समाधी



श्री संत सावता माळी बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त येथे पूजा आरती करण्यात आली यावेळी माजी सभापती नवनाथ शिराळे किशोर राऊत गोरख हाडोळे सुभाष जगताप इत्यादी भक्तगण



सोहळ्यानिमीत्त परळी परळीतील सावतामाळी मंदिर येथुन दुपारी १ वाजता पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला.डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या शेकडो महिला,अभंगाच्या चालीवर पाऊले खेळणारे महिला भजनी मंडळ,लेझीमच्या तालावर थिरकणारी तरुणाई,भगव्या पताका घेतलेले वारकर्यांचा सहभाग असलेला हा दिंडी सोहळा उखळवेस,गणेशपार,दिगंबर जैन मंदिर,अंबेवेस मार्गे वैद्यनाथ मंदिराच्या उत्तर घाटावर पोंहचल्यानंतर भजन,आरती करण्यात आली.नेहरु चौक,संत सोपानकाका मंदिर,राणी लक्ष्मीबाई टॉवर,पद्मावती गल्ली मार्गे सायंकाळी ५ वाजता संत सावतामाळी मंदिरात पोंहचल्यानंतर महाप्रसादाने दिंडी सोहळ्याची सांगता झाली.यानंतर रात्री ७ ते ९ वेळेत ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे हरिकीर्तन झाले.

**टीसी हरवला आहे**

प्रथमेश जगदिश कडू या नावाचा बारावीचा टीसी पुणे–बीड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.
संपर्क ९५०३२३१८७४, ९४२१२८१८७४

## पर्यावरण : मायक्रोप्लॅस्टिक आरोग्यासाठी गंभीर धोका

पर्यावरण

योगेश कुमार गोयल



नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन (नोआ) नुसार, मायक्रोप्लॅस्टिक्स हे पाच मिलिमीटरपेक्षा लहान प्लॅस्टिकचे कण आहेत. प्लॅस्टिकचे काही कण तर इतके सूक्ष्म असतात की ते उघड्या डोळ्यांनी पाहता येत नाहीत. भौतिक, जैविक आणि रासायनिक प्रक्रियांद्वारे तयार होणारे हे सूक्ष्म कण आरोग्यासाठी गंभीर धोका बनतात. एंडोक्राईन सोसायटीच्या 'जर्नल ऑफ क्लिनिकल एंडोक्राइनोलॉजी अँड मेटाबॉलिझम'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात हे तथ्य समोर आले आहे की प्लॅस्टिकला अधिक टिकाऊ आणि आरामदायी बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'थॅलेट' (ॲसिड कंपाऊंड्स) च्या संपर्कात आल्याने महिलांमध्ये मधुमेहाचा धोका वाढू शकतो. थॅलेट रसायनामुळे मधुमेहाव्यतिरिक्त प्रजनन क्षमतेवर देखील परिणाम होतो तसेच अन्य विकार देखील उद्भवू शकतात, असेही संशोधनात आढळून आले आहे.

ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासात मानवी विष्ठेमध्येही मायक्रोप्लॅस्टिक असल्याचे आढळून आले आहे, तर इंग्लंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ एक्सेटरच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या आणखी एका अभ्यासात किशोरवयीन मुलांच्या लघवीत प्लॅस्टिक निर्माण करण्यासाठी वापरले जाणारे 'बिस्फेनॉल ए' (बीपीए) हे रसायन लक्षणीय प्रमाणात आढळून आले. तर धक्कादायक बाब म्हणजे नेदरलँडमधील शास्त्रज्ञांना आईच्या दुधात मायक्रोप्लॅस्टिक आढळून आले. आईच्या दुधाच्या २५ पैकी १८ नमुन्यांमध्ये मायक्रोप्लॅस्टिक आढळून आले आहे.

मासे, गोगलगाय, कासव इत्यादी विविध सागरी प्राण्यांच्या शरीरात मायक्रोप्लॅस्टिक आढळून येणे या गोष्टीचा स्पष्ट संकेत आहे की आता पृथ्वीचा कोणताही कोपरा प्लॅस्टिकच्या दुष्परिणामांपासून अस्पर्शित नाही. आता महासागरांपासून नद्या, माती, हवा आणि पावसाच्या पाण्यापर्यंत प्लॅस्टिक पोहोचले आहे, ही सर्वाधिक चिंताजनक परिस्थिती आहे. उत्तर फुलमारच्या समुद्री पक्ष्यांच्या विष्ठेमध्ये ४७ टक्क्यांपर्यंत मायक्रोप्लॅस्टिक कण आढळले असल्याचा खुलासा शास्त्रज्ञांनी यापूर्वीच केला आहे.

सागरी प्राण्यांच्या शरीरात मायक्रोप्लॅस्टिक्सच्या अस्तित्वाचा केवळ सागरी परिसंस्थेवरच विपरीत परिणाम होतो असे नाही, तर सी-फूड खाणाऱ्या लोकांच्या शरीरातही या माध्यमातून मायक्रोप्लॅस्टिकचा शिरकाव होतो, जे हळूहळू त्यांच्या पोटात जमा होऊ लागते आणि व्यक्ती विविध प्रकारच्या आजारांना बळी पडू लागते. प्लॅस्टिकचे सूक्ष्म आणि दूषित रसायनांचे १२.५ टक्के कण माशांपर्यंत पोहोचतात आणि मासे ते कण अन्न समजून गिळतात, असे रॉयल मेलबर्न इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि हैनान युनिव्हर्सिटीच्या एका अध्ययनातून दिसून आले आहे. प्लॅस्टिकच्या या सूक्ष्म कणांमुळे त्यांची मोठी हानी होते. एवढेच नव्हे तर या कणांमुळे अनेक मासे मृत्युमुखी पडतात. २०५० पर्यंत समुद्रात पोहोचणाऱ्या प्लॅस्टिकचे वजन जगभरातील माशांच्या एकूण वजनापेक्षा देखील जास्त असेल, असा अंदाज आहे. इंडोनेशियातील एअरलंग्गा युनिव्हर्सिटीचे संशोधक वेरिल हसन यांच्या मते, मानवी शरीरात मायक्रोप्लॅस्टिक पोहोचवण्यासाठी सागरी मासे हे मुख्य माध्यम बनले आहे. शास्त्रज्ञांच्या मते, बहुतेक प्लॅस्टिक कचरा डंप यार्डमध्ये विघटित होतो आणि पाण्यात मिसळतो.

**प्लॅस्टिक प्रदूषण ही संपूर्ण जगासाठी एक गंभीर पर्यावरणीय समस्या म्हणून उदयास येत असून पर्यावरणात विरघळणारे प्लॅस्टिकचे (मायक्रोप्लॅस्टिक्स) सूक्ष्म कण मानवी शरीरात पोहोचून आरोग्यास गंभीर हानी पोहोचवत आहेत. त्यामुळेच जगभरातील शास्त्रज्ञ आता प्लॅस्टिकच्या सूक्ष्म कणांचा मानवी शरीरावर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास करत आहेत आणि त्याच्या दुष्परिणामांबाबत इशारा देत आहेत. लिपस्टिक, काजळ, शॅम्पू इत्यादी सौंदर्यप्रसाधने, खाद्यपदार्थांचे पॅकेजिंग, प्लॅस्टिकची भांडी इत्यादींमधूनही प्लॅस्टिकचे सूक्ष्म कण मानवी शरीरात पोहोचून नुकसान करीत आहेत. काही संशोधकाच्या अभ्यासानुसार, जगभरात प्लॅस्टिकमध्ये जवळपास १० हजार प्रकारांची रसायने कोणत्याही निर्बंधांशिवाय मिसळली जात आहेत.**

आययूसीएनच्या मते, गेल्या चार दशकांमध्ये समुद्राच्या पृष्ठभागावरील पाण्यामध्ये मायक्रोप्लॅस्टिक कणांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

शास्त्रज्ञांच्या मते, मायक्रोप्लॅस्टिक दीर्घकाळ मानवी आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करू शकतात. कारण त्यांच्यातील दूषित घटक अनेक रोगांशी संबंधित आहेत. ज्यात हृदयसंबंधी समस्यांव्यतिरिक्त लठ्ठपणा, मधुमेह, कर्करोग इत्यादींचा देखील समावेश आहे. मानवी शरीरात मायक्रोप्लॅस्टिक जाणे पचनसंस्था, आतडे आणि पेशींसाठी धोकादायक मानले जाते. याशिवाय कर्करोग, हृदयविकार, किडनी, पोट आणि यकृताचे आजार, लठ्ठपणा आणि मातेच्या गर्भातील भ्रुणाची वाढ थांबत असल्याचा शास्त्रज्ञांचा दावा आहे. मायक्रोप्लॅस्टिकमुळे गर्भवती महिलांमध्ये फुफ्फुसे, हृदय, मेंदू आणि गर्भाच्या इतर अवयवांना झपाट्याने नुकसान होऊ शकते. प्लॅस्टिकचे सूक्ष्म कण केवळ मानवी शरीराच्या पेशींवरच परिणाम करीत नाहीत तर ते शरीरातील रक्तप्रवाहात अडथळा आणतात आणि त्वचा आणि श्वसनासंबंधी धोके वाढवतात, असे विविध अध्ययनात आढळून आले आहे. एवढेच नव्हे तर मज्जासंस्थेवर देखील प्लॅस्टिकचे घातक परिणाम होत असल्याचे विविध अध्ययनात आढळून आले आहे. नुकत्याच झालेल्या एका संशोधनात खाद्यपदार्थ पॅकेजिंग तसेच पेंट (रंग) मध्ये वापररे जाणारे मायक्रोप्लॅस्टिक मानवी रक्तवाहिन्यांमध्ये आढळून आल्याचेही समोर आले आहे. अमेरिकेच्या यॉर्क मेडिकल स्कूलच्या संशोधकांनी केलेल्या या अध्ययनात तंत्रिका उत्तिकांमध्ये प्रति ग्रॅम १५ मायक्रोप्लॅस्टिक आढळले. शास्त्रज्ञांच्या मते, प्लॅस्टिकचे कण मानवी शरीरात सहजपणे पोहोचतात आणि त्यांच्या आकारानुसार हे कण एकतर उत्सर्जित होतात किंवा पोटात आणि आतड्यांमध्ये फसून बसतात किंवा रक्तात मुक्तपणे वाहत राहतात, ज्यामुळे शरीरातील विविध अवयव आणि ऊतींपर्यंत सहजपणे पोहोचतात आणि शरीर आजारी पडणे सुरू होते. प्लॅस्टिकचे हे सूक्ष्म कण मानवी आरोग्यासाठी टाईम-बॉम्बसारखे बनत आहेत, जे आपल्या



शरीराच्या अर्ध्याहून अधिक अंतर्गत अवयवांना नुकसान पोहोचवू शकतात. एवढेच नव्हे तर मानवी शरीरात दर आठवड्याला सरासरी एक क्रेडिट कार्डच्या वजनाइतके म्हणजे पाच ग्रॅम अथवा त्याहून अधिक प्लॅस्टिक मानवी शरीरात प्रवेश करीत आहे, असे मलेशिया, ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशियातील संशोधकांनी केलेल्या अभ्यासात सांगण्यात आले आहे. तर ५ मिमीपेक्षा लहान १२ ते १ लाख प्लॅस्टिक कण दररोज मानवी शरीरात प्रवेश करतात, असा दावा मलेशियन संशोधकांनी पूर्वीच केला आहे. त्यांच्या मते, वर्षभरात ११८४५ ते १९३२०० मायक्रोप्लॅस्टिक कण मानवी शरीरात प्रवेश करतात, ज्यांचे वजन ७.७ ते २८७ ग्रॅमपर्यंत असते. नेदरलँड्समधील व्रिज युनिव्हर्सिटी ॲमस्टरडॅमच्या संशोधकांच्या मते, मागील अभ्यासात असे दिसून आले होते की लहान मुलांच्या विष्ठेमध्ये प्रौढांपेक्षा १० पट जास्त मायक्रोप्लॅस्टिक होते आणि प्लॅस्टिकच्या बाटल्यांमधून दूध पिणारी मुले तर एकाच दिवसात लाखो मायक्रोप्लॅस्टिक कण गिळतात.

मायक्रोप्लॅस्टिक हे प्लॅस्टिकचे असे सूक्ष्म कण आहेत, जे सामान्यत: अन्न किंवा पेय पदार्थांच्या माध्यमातून किंवा श्वासोच्छ्वासाद्वारे आणि त्वचेच्या माध्यमातून देखील पचनसंस्था, श्वसन संस्था आणि रक्ताभिसरण प्रणालींमध्ये प्रवेश करू शकतात. मायक्रोप्लॅस्टिक लाल रक्तपेशींच्या बाहेरील पडद्याला चिकटून राहू शकतात आणि ऑक्सिजन वाहून नेण्याची त्यांची क्षमता मर्यादित करू शकतात, असेही एका अभ्यासातून समोर आले आहे. शरीरातील मायक्रोप्लॅस्टिक कणांचा सर्वात मोठा स्त्रोत पिण्याचे पाणी मानले जाते, ज्यामध्ये नळाचे पाणी आणि बाटलीबंद पाणी दोन्हीचा समावेश आहे. काही अभ्यासानुसार, बाटलीबंद पाण्यात मायक्रोप्लॅस्टिकचा धोका खूप जास्त असतो. अन्न आणि पेय पदार्थांव्यतिरिक्त, घरातील धुळीच्या माध्यमातून देखील मायक्रोप्लॅस्टिकचे कण मानवी शरीरात प्रवेश करतात, ज्यामुळे मानवांना मोठा धोका असतो. यामुळे संभाव्यपणे दररोज २६ ते १३० अतिरिक्त मायक्रोप्लॅस्टिक कण फुफ्फुसांच्या संपर्कात येतात.

शास्त्रज्ञांच्या मते, मायक्रोप्लॅस्टिक दीर्घकाळ मानवी आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करू शकतात. कारण त्यांच्यातील दूषित घटक अनेक रोगांशी संबंधित आहेत. ज्यात हृदयसंबंधी समस्यांव्यतिरिक्त लठ्ठपणा, मधुमेह, कर्करोग इत्यादींचा देखील समावेश आहे. मानवी शरीरात मायक्रोप्लॅस्टिक जाणे पचनसंस्था, आतडे आणि पेशींसाठी धोकादायक मानले जाते. याशिवाय कर्करोग, हृदयविकार, किडनी, पोट आणि यकृताचे आजार, लठ्ठपणा आणि मातेच्या गर्भातील भ्रुणाची वाढ थांबत असल्याचा शास्त्रज्ञांचा दावा आहे. मायक्रोप्लॅस्टिकमुळे गर्भवती महिलांमध्ये फुफ्फुसे, हृदय, मेंदू आणि गर्भाच्या इतर अवयवांना झपाट्याने नुकसान होऊ शकते.

शास्त्रज्ञांच्या मते, मायक्रोप्लॅस्टिक दीर्घकाळपर्यंत मानवी आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करू शकतात कारण त्यांच्यातील दूषित घटक हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आणि पुनरुत्पादक समस्यांव्यतिरिक्त लठ्ठपणा, मधुमेह, कर्करोग इत्यादींसह अनेक रोगांशी संबंधित आहेत. मानवी शरीरात मायक्रोप्लास्टिक्सची उपस्थिती पचनसंस्था, आतडे आणि पेशींसाठी धोकादायक मानली जाते याशिवाय कर्करोग, हृदयविकार, किडनी, पोट आणि यकृताचे आजार, लठ्ठपणा आणि गर्भाचा विकास थांबवण्याचा दावा केला जातो. आईच्या पोटात केले आहे. मायक्रोप्लास्टिक्समुळे गर्भवती महिलांमध्ये फुफ्फुसे, हृदय, मेंदू आणि गर्भाच्या इतर अवयवांना झपाट्याने नुकसान होते. तथापि, प्लॅस्टिकचे उत्पादन आणि वापर कमी करणे हाच मायक्रोप्लॅस्टिकला मानवी शरीरात प्रवेश करण्यापासून रोखण्याचा सर्वोत्तम आणि प्रभावी मार्ग आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आणि पर्यावरणविषयक तज्ज्ञ आहेत.)**

**(पांचजन्यवरून साभार)**

---

## भगवान शिवाचे निवासस्थान श्रीलंकेतील कोनेश्वरम मंदिर

संस्कृती

डॉ. उज्ज्वला चक्रदेव

कोनेश्वरम मंदिर, ज्याला हजार स्तंभांचे मंदिर देखील म्हणतात, श्रीलंकेच्या पूर्व प्रांतात आहे. प्राचीन काळात कोनेसर मलाईच्या शिखरावर हे मंदिर बांधले गेले होते. एक हजार स्तंभांच्या सभागृहाला आयिरम काल मंडपम असे म्हणतात. या विख्यात मंदिराची रचना द्रविड शैलीतील आहे. वास्तुकला, विस्तृत शिल्पे आणि बेस रिलीफसाठी ही त्या काळातील सर्वात मोठी वास्तू मानली जाते. इसवीसन ११३१ ते ११५३ पर्यंत पोलोन्नारुवावर सिंहली राजा गजबाहू द्वितीयचे राज्य होते. त्याच्या कारकिर्दीतच या मंदिराची प्रचंड भरभराट झाली.

महत्त्वाचे म्हणजे, कोनेश्वरमचे अनेक मजबूत ऐतिहासिक संबंध आहेत. वायू पुराणातही या मंदिराचे वर्णन केले आहे. 'दक्षिण कैलास पुराणम' मध्ये याचा उल्लेख 'दक्षिण कैलासम' (दक्षिणेकडील कैलास पर्वत) असा केला आहे. कांचीपुरमच्या कांचीप्पा शिवचारियार यांनी आठव्या-दहाव्या शतकात लिहिलेल्या 'कंद पुराणम' (एक पौराणिक तामिळ साहित्य महाकाव्य आणि स्कंद पुराणमचा अनुवाद) मध्ये तामिळनाडूचे चिदम्बरम् मंदिर, तिबेटचा कैलास पर्वत आणि श्रीलंकेतील कोनेश्वरम मंदिर यांचा जगातील तीन प्रमुख शिव निवासस्थान म्हणून वर्णन करण्यात आले आहे. कोनेश्वरम मंदिराच्या परिसरात १९७० च्या दशकात राजा राज चोल प्रथमची स्तुतीपर काव्य असलेला एक शिलालेख सापडला. राजराजा पहिला हा चोल सम्राट होता ज्याने इसवीसन ९८५ ते १०१४ पर्यंत राज्य केले. त्यानेच चोलांची राजधानी तंजावरमध्ये राजराजेश्वर मंदिराचे बांधकाम करण्याचे आदेश जारी केले होते. कोनेश्वरम हे केठीश्वरम जाफना मंदिर आणि रामनाथस्वामी मंदिर, रामेश्वरम यांना जोडलेल्या सरळ कर्ण मार्गावर आहे. २२५ किलोमीटर लांबीच्या या तीर्थमार्गावर हिंदू रीति-रिवाजानुसार भाविक अनेकदा पायीच यात्रा करतात. हा परिसर देखील कैलास पर्वताच्या अगदी रेखांशावर आहे. रामनाथस्वामी शिवलिंगाची स्थापना आणि पूजा श्रीरामाने श्रीलंकेच्या बेटावर पूल पार करण्यापूर्वी केली होती. मंदिराच्या परिसरात अनेक देवतांची मंदिरे आहेत. कोनेश्वरम द्वीपावर शिवाच्या पाच प्राचीन ईश्वरांमधील सर्वात पूर्वेकडील देवस्थान आहे, इतर



मंदिरे म्हणजे केरीमालाई, मन्नार, चिलाव आणि तेवन थुराई आहेत. मूळ मंदिरावरून वर्तमान मंदिरातील सध्याचे परिवर्तन लक्षात येत नाही. तथापि, तो संशोधनाचा प्रकल्प म्हणून हाती घेतला जाऊ शकतो. मंदिराचे मोक्याचे स्थान आणि स्थापत्य यामुळे हे केवळ श्रीलंकेतीलच नव्हे तर संपूर्ण भारतवर्षातील सर्वात महत्त्वपूर्ण मंदिरांपैकी एक मंदिर ठरले आहे.

## धर्माची पुनर्स्थापना करणारी भैरवी देवी

**स्त्रीत्व** हे ऊर्जेचे अत्यंत उग्र रूप आहे. ते कला, संगीत आणि जीवनातील सौंदर्यात आहे. स्त्रीत्वात हे घटक प्रबळ स्वरूपात असतात. आमच्याकडे काली, भैरवी सारख्या देवी आहेत ज्या स्त्रीत्वाची पूर्ण शक्ती दर्शवतात. पुरुष शक्तीच्या विपरीत, जी विजयावर विश्वास ठेवते ते स्त्री शक्तीचे स्वरूप सर्व व्यापून टाकणारे आहे. श्रद्धा, भक्ती, समर्पण याद्वारे देवीची कृपा प्राप्त करणे शक्य आहे.

**भैरवी देवी ही धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठीच अवतरली असा भाविकांचा दृढ विश्वास आहे. ओडिशातील गंजम जिल्ह्यातील एका छोट्या गावात उभारलेल्या तिच्या मंदिरात भाविक मोठ्या संख्येत येतात.**

भैरवी ही कुंडलिनीची देवी आहे. ती मूलाधार चक्रात राहते. तिचे यंत्र उलटा त्रिकोण दर्शवते. तिला शुभंकारी देखील संबोधले जाते. आपले भक्त, जे तिचे पुत्र आहेत, त्यांच्यासाठी ती शुभ कर्म करणारी आहे. यावरून ती एक चांगली, प्रेमळ माता देखील आहे हे दिसून येते. पण जेव्हा दुष्ट, दुर्जनांना शिक्षा द्यायची असते तेव्हा हीच देवी हातात शस्त्रे घेऊन उग्र रूप धारण करते. कलियुगाच्या शेवटी भैरवी देवी कल्की अवतारा सोबत येईल आणि धर्माची पुनर्स्थापना करेल असे सर्वसाधारणपणे मान्य केले जाते.

भैरवी देवीला समर्पित काही मंदिरे देशात आहेत. तिचे एक



मंदिर ओडिशातील गंजम जिल्ह्यातील बरहामपूरजवळील मंत्रिदी या छोट्या गावात आहे. ब्रह्मपूर माँ भैरवी मंदिर हे भारतातील चार आदिशक्ती पीठांपैकी एक आहे. हे मंदिर आठव्या शतकातील असल्याचे सांगितले जाते. देवतेची मूर्ती कच्ची, अपरिष्कृत असून तिला एकच पाय आहे म्हणून तिला 'एक पाद भैरवी' असे म्हणतात. मंदिर परिसरात ओडिशा शैलीची स्थापत्यकला दिसून येते. मंदिराचे शिखर उंच आहे आणि त्याला उभे कोनाडे आहेत ज्यामुळे ते आहे त्यापेक्षा उंच असल्याचा भास होतो. शिखराची गुळगुळीत वक्र रेषा गळ्याशी संपते ज्यामध्ये सुंदर नक्षीकाम केलेले घुमटाकार छत आहे. स्थापत्यशास्त्रापेक्षाही येथील स्थानाची आभा व भक्तांना मातेविषयी वाटणारे प्रेम व आदर यामुळे देशभरातून भक्त मोठ्या संख्येने देवीच्या दर्शनासाठी या मंदिरात येतात.

*(ऑर्गनायझरवरून साभार)*

---

## जम्मू-काश्मिरातील वाढते दहशतवादी हल्ले

विचार विनिमय

एकीकडे भारताचे केंद्र सरकार जम्मू-काश्मीरमध्ये शांततेचे वातावरण प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करताना दिसत आहे, पण दुसरीकडे अलीकडे तेथे दहशतवादी हल्ल्यांमध्येही वाढ झाल्याचे दिसून येत आहे. असे म्हणतात की अनेक क्रूर हल्ल्यांनी आपल्या अनेक शूर सैनिकांचे प्राण घेतले आहेत. जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादाचे मूळ अनेक दशकांपासून सुरू असलेला भू-राजकीय संघर्ष आणि प्रादेशिक शत्रुत्वात आहे. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून, हा प्रदेश दहशतवादाचे केंद्र बनला आहे. स्थानिक असंतोषाने प्रेरित आणि पाकिस्तानच्या बाह्य समर्थनामुळे येथील दहशतवादात अधिकच वाढ झाली. २००८ मधील मुंबई हल्ल्यामुळे एक महत्त्वाचे वळण आले. पाक पुरस्कृत दहशतवाद संपूर्ण जगापुढे आला. मुंबई हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग उघड केला. तेव्हापासून, दहशतवाद निखंदून काढण्यासाठी अनेक प्रयत्न करूनही या प्रदेशात हिंसक हल्ले झाले आहेत, जे दहशतवाद्यांच्या डावपेचांमधील महत्त्वपूर्ण बदल दर्शवितात. अलिकडच्या काळात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचे प्रमाण अधिक संघटित दृष्टिकोनाचे संकेत आहेत. सुरक्षा दलांना प्रदीर्घ काळ चकमकीत गुंतवून ठेवण्याचा दृष्टिकोन सध्याच्या रणनीतीमध्ये दिसतो. गेल्या काही दिवसांत झालेल्या हल्ल्यात दहशतवादी समूहांच्या कार्यपद्धतींमध्ये लक्षणीय बदल झाल्याचे संकेत मिळत आहेत. प्रत्येक हल्ल्याचे काळजीपूर्वक नियोजन केले गेले आहे, हल्ल्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी सुरक्षा कर्मचारी आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य केले आहे. कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांची आहुती देणारे सैनिक केवळ राष्ट्राचे रक्षकच नव्हते तर ते लाडके पुत्र, बंधू, पती आणि वडीलही होते. अग्रगण्य संरक्षण तज्ज्ञांच्या मते, अलिकडील हल्ले म्हणजे हे क्षेत्र अस्थिर करण्यासाठी आणि भारताच्या सुरक्षा यंत्रणेला कमकुवत करण्यासाठी पाकिस्तानचा एक सुनियोजित प्रयत्न असल्याचे संकेत मिळतात. सुरक्षा दलांवर हल्ले



करण्यासाठी दहशतवाद्यांना अत्याधुनिक व उच्चस्तरावरील प्रशिक्षण आणि रसद उपलब्ध करून दिल्याचे समोर आले आहे. संरक्षण विश्लेषकांनी प्रतिक्रियात्मक उपायांच्या पलीकडे जाऊन दहशतवादाला वेसण घालण्यासाठी निर्णायक व परिणामकारक धोरण आखण्याच्या गरजेवर भर दिला आहे. यामध्ये पाकिस्तानमधील दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट करणे, आपली गुप्तचर क्षमता वाढवणे आणि सीमापार दहशतवादाचा सामना करण्यासाठी अधिक सहकार्याला प्रोत्साहन देणे यांचा समावेश असू शकतो. दहशतवाद्यांना सडेतोड प्रत्युत्तर देताना सुरक्षा दलांनी उल्लेखनीय शौर्य दाखवले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद पुरस्कृत करण्याच्या पाकिस्तानच्या भूमिकेचे दूरगामी भू-राजकीय उद्देश आहेत. जागतिक स्तरावर पाकिस्तानला एकाकी पाडण्याचे भारताचे प्रयत्न तीव्र केले पाहिजेत. हिंसाचाराला प्रोत्साहन व पाठिंबा देण्याची आणि शांततेच्या प्रयत्नांना कमकुवत करण्याची पाकिस्तानची भूमिका जगासमोर उघडी केली पाहिजे. तसेच, प्रगत टेहळणी तंत्रज्ञानाच्या तैनातीद्वारे सीमेवरील सुरक्षा वाढविणे, संवेदनशील भागात सुरक्षा सैनिकांची संख्या वाढविणे आणि दहशतवाद्यांचे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी लक्षित ऑपरेशन्स करणे अशा उपायोजना केल्या पाहिजेत. दहशतवादाला स्थानिक घटकांचा मिळणारा पाठिंबा कमी करण्यासाठी जम्मू-काश्मीरमधील आर्थिक विकासाचा वेग वाढवणे आवश्यक आहे. ऑनलाईन कट्टरतावादाचा मुकाबला करण्यासाठी आणि दहशतवादी प्रचार नेटवर्कला अटकाव करण्यासाठी सायबर उपाय आवश्यक आहेत. माहिती युद्ध आणि मनोवैज्ञानिक अभियानांसह आधुनिक युद्ध रणनीतींचा अवलंब केल्यास दहशतवादी गटांना निष्प्रभ करण्यात मदत होऊ शकते. देशाची सुरक्षा आणि दहशतवादाच्या विळख्यापासून मुक्त भविष्यासाठी सरकार, सुरक्षा दल आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करणे अत्यावश्यक आहे.

**(भारतवाणीवरून साभार)**

---

## गोदावरी नदी

**गोदावरी** नदी गोदावरी ही दक्षिण भारतातील पवित्र आणि महत्त्वाची नदी आहे. नदीची लांबी १,४९८ किमी. जलवाहन क्षेत्र गंगेच्या खालोखाल ३,२३,८०० चौ. किमी. हिचा उगम नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक गावामागे सह्याद्रीतील ब्रह्मगिरी डोंगरावर होतो. प्राचीन काळी या भागात गौतम ऋषींचा आश्रम होता. त्यांनी गोहत्येच्या पातकाच्या निवारणार्थ शंकराची आराधना करून गंगा आणली, अशी कथा आहे. हल्ली लहानशा कुंडात थोडेसे पाणी असते. नंतर डोंगराच्या पूर्व कुशीत गंगाद्वार येथे लहानशा झऱ्यातून ते बाहेर येते. तेथपर्यंत ६९० पायऱ्या चढून जाता येते. तेथे कुंड व गंगेचे लहानसे देऊळ आहे. पायथ्याशी त्र्यंबकेश्वर क्षेत्र आहे. गोदावरी म्हणजे पाणी किंवा गाई देणारी, गाईचे पोषण करणारी असा अर्थ आहे. तेथून गोदावरी नदी पूर्व आग्नेय दिशेने नाशिक व अहमदनगर जिल्ह्यांतून वाहत जाते. पुढे ती अहमदनगर व औरंगाबाद आणि बीड व औरंगाबाद जिल्ह्यांची सीमा बनते. नंतर परभणी आणि नांदेड जिल्ह्यांतून गेल्यावर ती आंध्र प्रदेश राज्याच्या आदिलाबाद व निजामाबाद जिल्ह्यांच्या, आदिलाबाद व करीमनगर जिल्ह्यांच्या, महाराष्ट्राच्या चंद्रपूर व आंध्रच्या करीमनगर जिल्ह्यांच्या सीमांवरून जाऊन आग्नेयीकडे वळते. मग आंध्रच्या व खम्मम जिल्ह्यांतून जाऊन ती अधिक दक्षिणेकडे वळते व पूर्व आणि पश्चिम गोदावरी जिल्हे विभक्त करून शेवटी बंगालच्या उपसागरास मिळते. महाराष्ट्रात ती ६५० किमी. वाहते. सह्याद्रीपासून नाशिकपर्यंत गोदावरी अरुंद, खडकाळ मार्गाने येते. त्या वाटेवर गंगापूर येथे नदीवर धरण बांधले असून छोटासा धबधबा आहे.

# परिस्थितीवर मात करीत आजेगावातील दोन तरूणींची पोलिस भरतीमध्ये निवड

## गावकऱ्यांनी काढली भव्य मिरवणूक, ठिकठिकाणी दोघींचाही सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**
सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथील दोन तरूणींची नुकतीच पोलिस भरतीमध्ये निवड झाली आहे. घरची हलाखीची परिस्थिती असतांना या दोन्ही तरूणींनी परिस्थितीवर मात करीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाचे गावकऱ्यांकडून कौतुक होत असून पोलिस भरतीत निवड झालेल्या दोन्ही तरूणींची गावातून ढोलताशा, डीजेच्या तालावर भव्य मिरवणुक काढली. यावेळी ठिकठिकाणी त्यांचा सत्कार करण्यात आला. दोन्हीही मुलींनी समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे.

सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथील रहीवाशी असलेल्या पूजा रविप्रसाद अवस्थी आणि पल्लवी पंजाब वाघ या दोघींनीही घरची परिस्थिती हलाखीची असतांना परिस्थितीवर मात करून शिक्षण घेतले. पूजाने १२ वी उत्तीर्ण केल्यानंतर पोलिस भरतीची तयारी सुरू केली. तर पल्लवी ही पदवी शिक्षण घेत आहे. शिक्षण घेत असतांना त्यांनी पोलिस भरतीची तयारी सुरू केली. मैदानी चाचणी सोबतच लेखी परीक्षेची तयारी त्यांनी केली होती. मागील एक वर्षापासून पोलिस भरतीसाठी केलेल्या परिश्रमाला यश मिळाले आहे. पूजा हीची मीराभाईंदर येथे तर पल्लवीची वाशिम पोलीस दलात निवड झाली.

दरम्यान, पोलिस दलात निवड झाल्यानंतर त्या त्यांच्या गावी आजेगाव येथे आल्या. यावेळी गावकऱ्यांनी त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली.. दोघींनाही कारमध्ये बसवून त्यांची ढोलताशा आणि डीजेच्या तालावर गावातून मिरवणुक काढण्यात आली. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गावात ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करून त्यांचे अभिनंदनही करण्यात आले. गावकऱ्यांकडून दिला जाणारा सन्मान आणि प्रेम पाहून दोघींचेही डोळे पाणावले होते. शरिवारी गावातील जिल्हा परिषद शाळेत पूजा आणि पल्लवी यांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी पोलिस भरतीत निवड झालेल्या पूजा आणि पल्लवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आर्थिक परिस्थितीचा बाऊ करण्यापेक्षा त्यावर मात करून जिद्दीने यश मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहीजे असे त्यांनी सांगितले. भविष्यात पोलिस दलातच अधिकारी होण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करणार असल्याचा मनोदय त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# आदर्श महाविद्यालयाच्या छात्र सैनिकांचे एनसीसी परीक्षेत यश

## गुणवंतांना प्रमाणपत्रांचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**
येथील आदर्श महाविद्यालयात एनसीसी बी प्रमाणपत्र व सी प्रमाणपत्र परीक्षा २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास आघाव तर प्रमुख पाहुणे उपप्राचार्य प्रा.रमेश दळवी समन्वयक डॉ. संजय कयाल, एनसीसी विभाग प्रमुख मेजर पंढरीनाथ घुगे, निबंधक दिलीप दुबे, डॉ.सोपान खरात व एनसीसी गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.
एन सी सी प्रमाणपत्र परीक्षा २०२४ मध्ये एकूण १९ विद्यार्थी परीक्षार्थी होते. त्यापैकी १८ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. १४ विद्यार्थी बी ग्रेडमध्ये तर चार विद्यार्थी हे सी ग्रेड मध्ये उत्तीर्ण झालेले आहेत यामध्ये अंभोरे शीलन, धोत्रे ज्ञानेश्वर, गायकवाड किशन, गायकवाड श्रीराम, घुगे गौरव, घ्यार केदारलिंग, गोरे कुणाल, गुऱ्हाळकर कृष्णा, इंगोले सुरज, कांबळे सतीश, लेकुळे अभिषेक, पवार मंगेश, साखरे शिवदास, शिंदे ओमकार, शिंदे पवन, तनपुरे राजू, वाबळे राजेश, धवसे धनराज यांनी सी प्रमाणपत्र परीक्षेत यश संपादन केलेले आहे. बी प्रमाणपत्र परीक्षेत एकूण २६ विद्यार्थी परीक्षार्थी होते, ते सर्व उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेत ०७ विद्यार्थ्यांना ए ग्रेड व १९ विद्यार्थ्यांना बी ग्रेड मिळालेला आहे. होते यामध्ये भोपे युवराज, गाडगीळ आदिनाथ, कदम विठ्ठल, कोरडे ऋषिकेश, लेमले तुषार, माने सोमेश्वर, पातले वैभव, साबळे कृष्ण, शेख इरफान, शेळके आशिष, शिखरे गौरव, भिसे पल्लवी, फड पल्लवी, गायकवाड राधिका, खिलारे स्नेहा, मस्के गंगासागर, सावळे शिवानी, शेख नाझिया, श्रीवास्तव रेखा, सोनाळे राजनंदनी, सोनटक्के सृष्टी, तिवारी राधिका, देवकर शिवराज, गोरे शंकर, नवरंगबादी सोहेल, पठाडे सुनील यांनी यश संपादन केल्यामुळे त्यांचा गुणगौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य आघाव यांनी मार्गदर्शन करतांना एनसीसी प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत देशसेवा करण्यासाठी सज्ज रहावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर पंढरीनाथ घुगे व आभार प्रदर्शन डॉ. सोपान खरात यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती जल्लोषात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**
साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती नगरपरिषद कर्मचारी वसाहत येथे जल्लोषात साजरी करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे ध्वजारोहण मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्याहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अमोल धुमाळ हे होते तर उद्घाटक म्हणून माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर हे होते प्रमुख अतिथी भाजप लोकसभा प्रभारी रामदास पाटील, माजी नगराध्यक्ष सुधीर आप्पा सराफ दिलीप दादा चव्हाण,



बबन शिखरे, उपनगराध्यक्ष नेहाल भैया, नगरसेवक सुभाष बांगर, गणेश बांगर, अनिल नैनावानी, मिलिंद उबाळे, लिंबाजी बनसोडे, सुरेशअप्पा सराफ, नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वनाथ घुगे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बि.डी बांगर, शहराध्यक्ष केशव दुबे, अजिंक्य नागरे, बंटी नागरे, आनंदराव शिखरे, शेषराव चव्हाण, सोपानराव पाटोडे,अक्षय लवाळे, हे मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्याहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आला. त्याचबरोबर रामदास पाटील सुमठाणकर यांच्या सहयोगाने अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त १०४ रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच यावेळी आरोग्य शिबिराचे आयोजन राजस बहुउद्देशिय सेवाभावी संस्था यांच्या वतीने करण्यात आले. त्यानंतर अन्नदान कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबन शिखरे यांनी केले. सूत्रसंचालन विजय शिखरे तर उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार सुमित कांबळे यांनी मानले. जयंती यशस्वी करण्यासाठी सुमित कांबळे, अध्यक्ष सचिन जाधव, सतीश खंदारे, अतिश इंगळे, सुदर्शन कांबळे, विशाल बनसोडे, संदीप गायकवाड, संतोष खंदारे, हिरामण ढोक, रवी कांबळे, चरण कांबळे व साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महोत्सव समिती, नगरपरिषद कर्मचारी, वसाहतीमधील सर्व मित्र परिवारांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली– संत शिरोमणि सावता महाराज यांची पुण्यतिथी सकल माळी समाज बांधवांच्यावतीने हिंगोली शहरात साजरी करण्यात आली. याप्रसंगी संत सावता माळी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी हभप सागर महाराज यांचे किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाज बांधवांकडून शहरात समाज मंदिर बांधण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने सकल माळी समाजातील महिला, पुरूष यांची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### युवक–युवतीसाठी फॅशन डिझाईन मोफत प्रशिक्षण

हिंगोली– जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने औंढा नागनाथ तालुक्यातील सर्वसाधारण प्रवर्गातील युवक व युवतीसाठी फॅशन डिझाईनचे मोफत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी उमेदवार हा किमान आठवी पास असावा, वय १८ ते ४५ असावे. यासाठी आधार कार्ड, पासपोर्ट फोटो, टीसी, बँक पासबूक जमा करुन फॅशन डिझाईन प्रशिक्षणासाठी दि. ९ ऑगस्ट, २०२४ पर्यंत आपली नाव नोंदणी करावी. नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी किसन धाबे (९३७०६३१४६१) कार्यक्रम आयोजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस–१२, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक एस. के. कादरी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी सुधीर आठवले यांनी केले आहे.

### जिल्ह्यात सरासरी २४ मिमी पाऊस

हिंगोली– जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी २४.३० मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, हिंगोली तालुक्यात सर्वात जास्त ३५.९० मि.मी. पाऊस झाला आहे. औंढा नागनाथ तालुक्यात सर्वात कमी १२.४० मि.मी. पाऊस पडला आहे. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. हिंगोली ३५.९० (५२०), कळमनुरी १९.७० (४७३), वसमत १३.८० (४१७.३०), औंढा नागनाथ १२.४० (४१८.८०) आणि सेनगाव तालुक्यात ३५.८० (४५४.२०)मि. मी. पाऊस पडला आहे. सर्व आकडेवारी मिलीमीटर परिमाणात आहे. हिंगोली जिल्ह्यात दिनांक १ जून २०२४ ते २ ऑगस्ट, २०२४ पर्यंत सरासरी ४५९.६० मिलीमीटर पाऊस पडला आहे. त्याची टक्केवारी ५७.७९ अशी आहे.

### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक



हिंगोली– लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त समाज बांधवांच्यावतीने भव्य मिरवणुक काढण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने महिला, पुरूष, युवक–युवती सहभागी झाले होते. ढोलताशांच्या गजरात तसेच डीजेच्या तालावर ही मिरवणुक शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. खिचडीचे वाटप करण्यात आले.

# महसुल पंधरवाड्यात विविध उपक्रम राबविणार– खुशालसिंह परदेशी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**
महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत जिल्ह्यातील नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. त्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार महसूल पंधरवाड्यात तालुकास्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी सांगितले आहे.
यामध्ये ३ ऑगस्टला मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगस्टला स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगस्टला कृषि मार्गदर्शन कार्यक्रम, ६ ऑगस्टला शेती, पाऊस आणि दाखले, ७ ऑगस्टला युवा संवाद, ८ ऑगस्टला महसूल–जन संवाद, ९ ऑगस्टला महसूल ई–प्रणाली, १० ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ११ ऑगस्टला आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन, १२ ऑगस्टला एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, १३ ऑगस्टला महसूल अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण, १४ ऑगस्टला महसूल पंधरवाडा वार्तालाप तर १५ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल पंधरवाडा सांगता समारंभाचा कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी कळविले आहे.

# औंढा नागनाथ तालुक्यातील १२ हजार ५४१ विद्यार्थी गणवेशा विना

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ३ ऑगस्ट**
केंद्र शासनाच्या समग्र शिक्षण कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश दिला जाणार होता पण घोडे कुठे काढले कळालेच नाही.
आज घडीला शाळा सुरू होऊन दीड महिना उलटला. अद्याप पर्यंत मुलांना शालेय गणवेश मिळाले नाही. पंधरा दिवसावर स्वातंत्र्य दिन असून या वेळेला तरी गणेश मिळेल या आशेवर विद्यार्थ्यांचे पालकही अपेक्षा करत आहेत. समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा मधुन एकसमान रंगांचे दोन गणवेश एक जोडी बूट व दोन जोड्या पाय मोजे देण्यात येणार होते. त्यामध्ये अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांच्या मुलांना हा लाभ मिळणार होता दरवर्षी शालेय व्यवस्थापन समितीकडे निधी मिळाल्यानंतर गणवेश खरेदी करून मुलांना दिल्या जात होता मात्र नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊन महिना उलटला तरी अजूनही विद्यार्थ्यांना गणवेश मिळालाच नाही त्यामुळे पालकांमधून नाराजीचा सूर उमटत आहे. आत्तापर्यंत जिल्ह्यालाच गणेवेशासाठी कापड उपलब्ध झाले नाही. तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळांना कापड कधी उपलब्ध होईल हे सांगणे अवघड झाले असले तरीही विद्यार्थ्यांमधून स्वातंत्र्यदिनी तरी गणवेश मिळेल हीच अपेक्षा केली जात आहे.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरू करा– अजित मगर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट–** जिल्ह्यातील काही गावांमध्ये मागील पंचवार्षिक काळात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबवण्यात आला होता. कोरोना काळात या प्रकल्पाला मुदतवाढ देण्यात आली होती परंतु सध्या पुढील टप्प्यातील यादी अद्याप जाहीर केली नाही. हिंगोली जिल्हा ना उद्योग जिल्हा असून येथील सर्व नागरिकांची उपजीवीका ही शेतीवर अवलंबून आहे. यामुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे. शेती सिंचनाच्या अनुशेष शासनाने अद्यापही भरून काढला नाही. त्यासाठी जिल्ह्यातील उर्वरित गावांना नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प लागू करणे अत्यावश्यक असल्याचे अजित मगर यांनी म्हटले आहे.

# हिंगोलीत मनसेची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**
महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हाध्यक्ष बंडू कुटे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्राम गृह येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना सर्व पदाधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली.
८ व ९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे हे हिंगोली जिल्ह्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने आज शासकीय विश्रामगृह येथे आढावा बैठक घेण्यात आली.हिंगोली जिल्ह्यातील तीनही विधानसभा पुर्ण ताकदीने लढवण्यात येणार आहेत, आशी माहिती जिल्हाध्यक्ष बंडू कुटे यांनी दिली. जिल्हा सचिव दिपकराव वडकुते, जिल्हा उपाध्यक्ष विनोद बांगर, संतोष खंदारे, मनविसे जिल्हाध्यक्षअजिंक्य घुगे, काशिनाथ टोंपे, दिपकराव सांगळे, माऊली कामखेडे, मोहन बांगर, सोनू वाढवे, अविनाश जाधव, कपिल बलखंडे, अमोल बांगर, प्रविण कान्हे, नितीन कऱ्हाळे, रोहन तांदळे, हनुमान घुगे, दिपक पाईकराव, दत्तराव देशमुख , अमर गाभणे यांच्यासह मोठ्या संखेने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थीत होते.

# हिंगोली शहरात युध्दपातळीवर नगर पालिकेकडून स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ ऑगस्ट**
नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी हिंगोली शहरातील अस्वच्छतेबाबत अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांचेवर नाराजी व्यक्त करीत कारवाई करण्याचे निर्देश देताच हिंगोली शहरात स्वच्छतेच्या कामाला युध्दपातळीवर सुरूवात झाली आहे.



भाजपच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांची भेट घेऊन शहरातील स्वच्छता व समस्यांचे निराकरण करण्याची मागणी केल्यानंतर नगर पालिका प्रशासन ॲक्शन मोडमध्ये येऊन स्वच्छता विभागातील अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांची बैठक घेऊन तातडीने संपूर्ण शहरात स्वच्छतेची कामे युद्धपातळीवर सुरु करण्यात आली आहेत. कामे न केल्यास योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे निर्देश मुख्याधिकारी मुंढे यांनी देताच स्वच्छता विभागातील कर्मचारी व कंत्राटदार हे युद्धपातळीवर स्वच्छतेच्या कामाला लागले आहेत. शहरातील बावनखोली येथील रस्ता, संभाजी मंदिर शाळेसमोरील रस्ता, औंढा पोइंट रोड, एस.पी. निवासस्थान रस्ता, जुना मोंढा परिसर, जुना सरकारी दवाखाना रस्त्यावर जेसीबी लावून स्वच्छतेची कामे करण्यात्त येत आहेत तसेच शहरात फिरणाऱ्या मोकाट जनावरांचा सुद्धा बंदोबस्त करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अवयवदान जनजागृतीसाठी प्रत्येकांने पुढाकार घ्यावा: जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ ऑगस्ट -**

अवयवदान किंवा अंगदान हा विषय फार महत्वाचा असून, अवयवदात्याच्या या सर्वश्रेष्ठ दानामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळते, त्यामुळे या कार्यात सर्वांनी पुढाकार घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.



आज आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्यावतीने अवयवदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

देशात जगात आज अनेक रुग्ण अवयव प्रत्यापरोपणासाठी प्रतिक्षेत आहेत. त्यांना जीवनदान देण्यासाठी स्वयंप्रेरणेने पुढे येणे आवश्यक आहे. आपल्या मुत्यूपश्चातही आपण अवयवदान करुन समाजाच्या, इतराच्या कामी लागू शकतो ही भावना बाळगून समाजातील प्रत्येकांने अवयवदानासाठी व अवयवदानाच्या जनजागृतीसाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले

अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख, न्यायाधीश शिवाजी इंदलकर, ए.पी.कराड, एम.आर. सोवनी, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापिठाचे निबंधक शशिकांत ढवळे, संचालक मल्लिकार्जून करजगी यांची विशेष उपस्थिती होती. तसेच आरोग्य विभागातील डॉक्टर्स, अधिकारी, कर्मचारी, अनेक सामाजिक संघटनाच्या प्रतिनिधींची तसेच जिल्ह्यातील ३० शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मानवी जीवनातील सर्वात श्रेष्ठ दान कोणते असेल तर ते अवयवदान असून यांची समाजात जनजागृती होणे खूप आवश्यक आहे. अवयवदानाचे महत्व आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीने या पुण्यकार्यात सहभागी होण्याचे आवाहन करुन अवयवदानाची गरज अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी यावेळी स्पष्ट केली.

आपले आरोग्य सुदृढ असेल तरच आपण अवयवदाते होवू शकतो यावर भर देतानांच एक अवयवदाता ८ ते ९ गरजू रुग्णांना अवयवदान करुन जीवनदान देऊ शकतो असेही त्यांनी सांगितले.

समाजात जनजागृती करण्यासाठी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने जनजागृती मोहिम आयोजित केली होती. या मोहिमेअंतर्गत महाविद्यालयातर्फे विविध स्पर्धा, कार्यशाळा, व्याख्यानमाला आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मोहिमेचा उद्देश समाजात अवयवदानाचे महत्व पटवून देणे आणि अधिकाधिक लोकांना अवयवदानासाठी प्रेरित करणे हा होता. या रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बधिरशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. वैष्णवी कुलकर्णी, डॉ. सचिन तोटावार, प्रशासकीय अधिकारी डॉ. बालाजी डोळे सहयोगी प्राध्यापक , समाज सेवा अधिक्षक, आणि विभागातील निवासी डॉक्टरांनी विशेष योगदान दिले.

# ओबीसीत राजकीय जागृती झाली पाहिजे : ॲड. बाळासाहेब आंबेडकर



**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ३ ऑगस्ट -**

मनोज जरांगेंच्या अवास्तव मागणींमुळे व दादागिरीच्या वागण्यामुळे ओबीसी समाज एकवटला आहे. ओबीसीच्या हक्कावर गदा आल्यावर मागील अनेक वर्षात झाले नाही ते आता होत आहे, ओबीसीत राजकीय जागृती निर्माण होत आहे. ही आनंदाची बाब आहे, यापुढे ओबीसींनी नेते तयार करावे. विधानसभा निवडणुकीच्या पुर्वी ओबीसी आरक्षणाला धोका नसुन विधानसभा निवडणूकीनंतर खरा धोका असुन निवडणुकीनंतर विधानसभेत ओबीसींचे १०० आमदार निवडून येणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी केले. माळाकोळी येथे ओबीसी आरक्षण बचाव यात्रेनिमित्त आयोजित ओबीसी मेळावा प्रसंगी बोलत होते

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकुर, नांदेड जिल्हा प्रभारी सर्वजीत बनसोडे, अविनाश भोसीकर, आयोजक माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील, अजय बारस्कर,प्रवक्ता फारुक अहेमद, संजय पवार, जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, माधव मुसळे, माऊली गिते, केशव तिडके, माजी सरपंच जालिंदर कारणे, सरपंच जनार्धन तिडके, उपसरपंच आरती कांबळे, उत्तम चव्हाण, सचिन बल्लोरे, सरपंच केरबा केंद्रे, सरपंच अशोक गिते, चक्रधर घुगे, सरपंच प्रभाकर केंद्रे, सरपंच बाळासाहेब गर्जे, ओम साखरे यांच्यासह सकल ओबीसी समाजाची उपस्थित होते.

पुढे बोलताना ॲड. बाळासाहेब आंबेडकर म्हणाले राज्यात १६९ श्रीमंत मराठा घराणे आलटुन पालटुन सत्तेत असतात. यांच नात्यागोत्याच राजकारण आहे, गरीब मराठा समाजाचा खरा लढा ओबीसी समाजाशी नसुन या श्रीमंत मराठ्यांशी आहे असेही ते यावेळी म्हणाले. ओबीसींच नेतृत्व राज्यात फक्त गोपीनाथराव मुंडे यांनीच केले आहे. त्यांच्यानंतर ओबीसींना सर्वमान्य नेता मिळाला नसल्याचे ते म्हणाले.

**समाजासाठी पक्षविरहीत भुमिका घेणारा नेता म्हणजे गोपीनाथराव मुंडे**

पक्षावर नियंत्रण असणारा नेता म्हणजे गोपीनाथराव मुंडे यावेळी बोलताना बाळासाहेब आंबेडकर म्हणाले. ओबीसींचा सर्वमान्य एकच नेता होता तो म्हणजे गोपीनाथराव मुंडे. त्यानंतर सर्वमान्य नेता नाही. पक्षाला बाजुला सारुन अन्यथा पक्षाला सोबत यायला भाग पाडुन गोपीनाथराव समाजाची भुमीका घेत होते. समाज किंवा सत्ता यामध्ये गोपीनाथराव मुंडेनी कायम समाज निवडला, सत्ता नाही. यासाठी त्यांनी युती सरकारच्या काळातील उदाहरण दिले. ओबीसी महामंडळासाठी गोपीनाथराव मुंडे यांनी राजीनामा देण्याची तयारी केली होती असे ते म्हणाले.

**आम्ही वेगळे लढलो म्हणून पराभुत**

या लोकसभा निवडणुकांमध्ये मी, पंकजा मुंडे, महादेव जानकर पराभूत झालो, आम्ही एकत्र लढलो असतो तर पराभूत झालो नसतो असे वक्तव्य करत प्रकाश आंबेडकर यांनी पंकजा मुंडे व महादेव जानकर या भाजपातील नाराजांना साद घातली आहे. या वक्तव्यानंतर उपस्थित ओबीसी समाजात नवीन समीकरणाची चर्चा होती.

**ओबीसी समाज एकवटला**

सकल ओबीसी समाज कंधार लोहाच्या वतीने मतदारसंघात सुरु असलेल्या ओबीसी एकजुटीचा परिणाम आजच्या ओबीसी मेळाव्यात दिसुन आला. प्रचंड गर्दी, जागोजागी स्वागत, नांदेड जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर स्वागत कमानी, बॅनर व गर्दी दिसुन येत होती. मेळाव्याचे संयोजक चंद्रसेन पाटील यांनी माळेगाव येथे यात्रेचे स्वागत करुन माळाकोळी येथे यशस्वी मेळावा पार पाडला. यावेळी प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकुर, अविनाश भोसीकर, सर्वजीत बनसोडे, आयोजक चंद्रसेन पाटील, शिवा नरंगले, माऊली गिते यांची भाषणे झाली.

## संक्षिप्त वृत्त

### अर्धापूर शहरात एज्युव्हीजन इंग्लिश स्कूलमध्ये ग्रीन डे उत्साहात साजरा

**अर्धापूर -** अर्धापूर शहरातील श्री रावते सरांचे एज्युव्हीजन प्री प्रायमरी स्कूल मध्ये ग्रीन कलर डे उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी हिरव्या रंगाचे ड्रेस घालून कार्यक्रमात सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना हिरव्या रंगाबद्दल माहिती सांगण्यात आली तसेच हिरव्या रंगातील विविध वस्तूंची पदार्थांची भाजीपाल्यांची , नवनवीन गोष्टींची ओळख करून देण्यात आली व महत्त्व पटवून दिले. या दिवसानिमित्त शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती यामध्ये हिरवा रंग ज्या ज्या वस्तूंचे, प्राण्यांचे, भाजीपाला इत्यादींची चित्रे रंगविण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना हिरव्या रंगाची मिठाई देऊन करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील श्रेया मिस, अल्का मिस, अंजली मिस, छाया मिस, प्रियंका मिस, गिल मिस,पुरी सर यांनी परिश्रम घेतले, तसेच या यशाबद्दल शाळेचे कजऊ प्रतीक सर आणि प्राचार्य सौ प्रिया रावते मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**भोकर -** लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रफूल्लनगर येथील नियोजीत जागेवर सकाळी १० वाजता जेष्ठ समाजसेवक तथा माजी नगरसेवक सूभाष पा.घंटलवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दि.१ ऑगस्ट रोजी प्रफूल्लनगर भागात ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ समाजसेवक तथा माजी नगरसेवक सूभाष पा.घंटलवार तर प्रमूख पाहूणे म्हणून नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शेख यूसूफभाई जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य राजूभाऊ कदम माजी नगरसेवक विकास क्षिरसागर शेख मझर राजेश सावते राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी तालूकाध्यक्षा यशोदाताई शेळके कमलताई नर्तावार वाघमारे ताई आदिंची प्रमूख उपस्थिती होती प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे या महापूरुषांच्या प्रतिमेचं पूजन करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी जी.जी.गाडे,रमेश गूंडेकर, लक्ष्मणराव बासनूरे, संदिप नरवाडे, साहेबराव वाहूळकर, संतोष शहा, अमोल बसवंते, साईनाथ बसवंते,गंगा बसवंते, अरुण चांदणे, गंगाप्रसाद बसवंते, यशवंत सूर्यवंशी, देविदास पोतरे, जनार्धन बसवंते, हर्षवर्धन धोतरे, विकास डोंगरे, लक्ष्मीबाई बसवंते, मंगलताई गूंडेकर,आदिसह समाजबांधवाची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### निवघा येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**मुदखेड -** मुदखेड तालुक्यातील निवघा येथे लोकशाहीर शिवशाहीर साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ.अण्णाभाऊ साठे समाज मंदिर येथे ध्वजारोहण व लहुजी वस्ताद साळवे चौकात ध्वजारोहण करण्यात आल. लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शालेय साहित्य वही पेन वाटप करण्यात आले. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शालेय साहित्य व फळे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बारड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष केदासे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष माधव गायकवाड सर, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गचे सर, व सर्व शिक्षक शिक्षिका कर्मचारी व यशवंतराव चव्हाण माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक डॉ स्वप्निल बनसोडे, पवार एस व्ही मुखेडकर, धनंजय भोसले, व पूर्ण स्टॉप व ग्रामपंचायत सरपंच गोदावरीबाई दत्तरामजी थोरात उपसरपंच प्रतिनिधी उद्धव पाटील पवार, पोलीस पाटील पुंडलीक पाटील पवार, माजी पंचायत समिती उपसभापती राजेश पाटील पवार, चेअरमन प्रकाशराव पाटील पवार, माजी मार्केट कमिटी तज्ञ संचालक विठ्ठल पाटील पवार, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना संचालक शिवाजी पवार, माजी सरपंच मनिषाताई संभाजी एडके, ओमप्रकाश पाटील पवार, युवासेना जिल्हा चिटणीस नांदेड पवन मारोतराव आटकलवाड, ग्रामपंचायत सदस्य केरबा ऐडके, वाईस चेअरमन हणमंत पाटील पवार, संजय पाटील पवार, विश्वनाथ पाटील पवार, ग्रामपंचायत सदस्य लखण कारले, प्रभाकर पाटील पवार, चंद्रकांत पाटील पवार, ज्ञानेश्वर पाटील पवार, नामदेव पाटील पवार, तिरुपती पाटील पवार, संभाजी एडके, ग्रामपंचायत सदस्य देविदास कांचनगिरे, योगेश पवार, मुन्ना पवार, आनंद ऐडके, सुनिल ऐडके, ज्ञानेश्वर एडके, मुदखेड तालुका कार्याध्यक्ष गजानन भालेराव निवघेकर(-इड क्रांती फोर्स सेना),साहेबराव ऐडके पवन गायकवाड, डॉ.अण्णा भाऊ साठे जयंती मडळ व समस्त गावकरी मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# चोरीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ ऑगस्ट -**

नांदेड- मोटरसायकल चोरी, जबरी चोरी गुन्ह्यातील तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून त्यांच्याकडून ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून पथकाने दि. २ ऑगस्ट रोजी हिंगोली गेट परिसरातून दिलीप अशोक कांबळे, अविनाश बाबू भरांडे दोघे रा. अजनी ता. बिलोली व एका बालकास अटक केली. त्यांच्याकडून वजीराबाद पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील हिरो कंपनीची मोटरसायकल तसेच रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नगदी १२ हजार रुपये व देगलूर पोलीस ठाण्यातील पुण्यातील नगदी २६ हजार रुपये असा एकूण ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, सहाय्यद पोलीस उपनिरीक्षक माधव केंद्रे, पोहेकॉ. रुपेश दासरवार, बालाजी यादगिरवाड, ज्वालासिंग बावरी, मारुती मोरे, हनुमानसिंह ठाकुर, शेख कलीम यांच्या पथकाने केली.

# बुथ कार्यकर्त्यांनी अंतर्गत मतभेद बाजूला ठेवावे : अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ३ ऑगस्ट -**

अगामी निवडणुकात भा.ज.प कार्यकर्त्यांनी बुथ निहाय नियोजन करून गांव साभाळण्याचा मोलाचा सल्ला देऊन अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून पक्षासी एकनिष्ठेने काम करण्याचा कानमंत्र 'संवाद सहकार्याशी अधिवेशनात बोलतांना दिला.

मुदखेड तालुका भा.ज.प च्या वतीने ता.२ (शुक्रवारी) रंछोडदास मंगलकार्यालयात संवा सहकार्याशी बुथ कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. या वेळी भा.ज.प जिल्हा महामंत्री प्रविण गायकवाड, भा.जपा तालुका अध्यक्ष बालाजी पा खडींग, तालुका समन्वयक बाळासाहेब देशमुख बारडकर, माजी नागराध्यक्ष नारायणराव कोत्तावार, माजी नगरसेवक शहर समन्वयक संजय आउलवार, शहर अध्यक्ष संजय सोनटक्के, जिल्हा उपाध्यक्ष शंकर मुक्तुलवार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक गांधी पवार, निलेश देशमुख बारडकर, माजी नगराध्यक्ष सुनील शेट्टी,माजी ता.अध्यक्ष हनुमंतराव देशमुख, मा उपनगराध्यक्ष माधव कदम, मा सभापती डॉ मानिक जाधव, रत्नाकर शिंदे, लक्ष्मणराव जाधव, मुन्ना चांडक, डॉ संदिप पचलींग, संतोष गाडे आदिंची उपस्थिती होती. या वेळी अशोक चव्हाण यांनी थेट सहकार्याशी थेट संवाद साधत केंद्र व राज्याच्या भाजप सरकारने राबविलेल्या विविध योजनांसदर्भात मार्गदर्शन केले.

मुदखेड तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांनी अगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक गावांत बुथ कमिटी ची मोट बांधावी गावातील अंतर्गत गटबाज्या बाजुला ठेवून राज्यातील भा.ज.प सरकारने जंतेसाठी राबविलेल्या योजनांची माहिती देऊन लाभ मिळवून द्यावा. सध्या राज्यात महायुतीचे सरकार जोमाने काम करीत असून कार्यकर्त्यांनी भाजपा चा आलेख मतदारांपर्यंत पोहचववने गरजेचे आहे. यावेळी भाजप च्या कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीत भाजप प्रनित उमेदवारास मत्ताधिक्यांनी निवडून आनण्माचा निर्धार करण्यात आला आहे. कालिदास जंगिलवाड, प्रताप सुर्यवंशी, राजू बारतोंडे, अमोल आबादार, हमीद भाई भंगार वाले, गुलाब सुर्यवंशी यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप च्या बुथ कमिटी मेळाव्यास अशोक चव्हाण संबोधित करत असतांना भाजप च्या काही शब्दांचा सराव करावा लागेल असे म्हणताच कार्यकर्त्यात एकच हस्यापिकली तालुका म्हणजेच मंडळ असा उल्लेख करावा लागतो हे सांग्याचे ते या वेळी विसरले नाही. भाजपा कार्यकर्त्यांनी नौख्या कार्यकर्त्यांना एक दिलाने सामावून घ्यावे असा कानमंत्र ही देऊन गेले.

# मुंबई येथे शरद पवार यांची आशाताई शिंदेंनी घेतली सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ३ ऑगस्ट -**



शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे यांनी दि. ३ ऑगस्ट रोजी मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या निवासस्थानी सिल्वरओक येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी शरदचंद्र पवार व आशाताई शिंदे यांच्यामध्ये लोहा कंधार मतदार संघातील विविध विषयावर सखोल चर्चा करण्यात आली.आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची मुंबई येथे त्यांच्या सिल्वर ओक येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतल्याने मतदारसंघात चर्चा वारे वाहत आहेत यावेळी कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर पाटील चोंडे सह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



हदगाव - हदगाव तालुक्यातील शिरड रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे पावसाचे पाणी खड्ड्यामध्ये साचत असल्याने वाहन चालवताना खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

# प्रा. कांबळेंनी घेतली प्रदेशाध्यक्ष पटोलेंची भेट

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ३ ऑगस्ट -**



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधत प्रा. उत्तमकुमार कांबळे यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची प्रदेश कार्यालय टिळक भवन, मुंबई येथे भेट घेतली. या भेटीदरम्यान सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगण्यात येते.

देगलूर महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे यांनी १९९४ ते २००९ या आठरा वर्षाच्या काळात काँग्रेस पक्षाच्या अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त घेतलेल्या भेटीदरम्यान जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. गेल्या काही दिवसांपुर्वी प्रा. कांबळे काँग्रेसमध्ये प्रवेश केले असले तरी, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले प्रा. उत्तमकुमार कांबळे यांची घरवापसी झाले असल्याचे म्हणाले.

# लोहा येथे बोगस खते विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ ऑगस्ट -**

नांदेड जिल्ह्यामध्ये कृषी विभागाने खते, बियाणे, रासायनिक औषधी व अन्य कृषी सामग्रीची जोरदार तपासणी सुरू केली आहे. लोहा तालुक्यात लोहा येथील बनावट युरिया व खताची विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकावर कारवाई करण्यात आली आहे. विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

लोहा पंचायत समितीमध्ये शेतकरी ज्ञानेश्वर शंकर खैरे यांनी लोहा येथील संगम कृषी सेवा केंद्रातून बनावट (बोगस ) खताची विक्री होत असल्याबाबतची तक्रार केली होती. त्यानंतर २४ जुलै रोजी तालुका कृषी अधिकारी तथा गुण नियंत्रक निरीक्षक शैलेश हरी वाव्हळे यांनी रामदास गंगाधर बामणे यांच्या मालकीच्या लोहा येथील संगम कृषी सेवा केंद्रात जाऊन प्रत्यक्ष तपासणी केली. त्यावेळी त्यांच्या असे लक्षात आले की, इफको कंपनीचे बनावट खते आरसीएफ कंपनीचा बनावट युरिया अवैध या संग्रही केलेला आहे .

प्राथमिक अंदाजावरून इफको कंपनीच्या तपासणी अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी नमुने तपासले. त्यानंतर सदर नमुने छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोग शाळेमध्ये पाठविण्यात आले. या प्रयोगशाळेने हे सर्व खते बनावट असल्याचे स्पष्ट केल्यामुळे तालुका कृषी अधिकारी तथा गुण नियंत्रक निरीक्षक शैलेश वाव्हळे यांनी यासंदर्भात लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

रासायनिक खते नियंत्रण १९८५ , अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमाने या संदर्भात रामतीर्थ येथील रहिवासी असणारे रामदास गंगाधर बामणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तक्रारीची वाट बघू नका**

दरम्यान, या घटनाक्रमानंतर कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांची खते, रासायनिक औषधी, बियाणे याबाबत फसवणूक होणार नाही यासाठी सर्व गुण नियंत्रक निरीक्षकांनी कृषी केंद्रांची तपासणी करावी. या संदर्भातील नियमित अहवाल सादर करावे, असे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत.जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांनी तक्रार करण्याची वाट न बघता या तपासण्या झाल्या पाहिजेत. कोणत्याही अधिकाऱ्याच्या क्षेत्रात असे काही आढळून आल्यास संबंधितांना ही जबाबदार पकडण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. कोणत्याही ठिकाणी बनावट विक्री होऊन फसवणूक होणार नाही याची काळजी घेण्याबाबतही त्यांनी कृषी विभागाला सूचना केल्या आहेत.

